# हिंदुबोध

संपादक : रविकांत कळंबकर

■ शके १९४७ ■ वर्ष २५ ■ अंक १२ ■ मार्च २०२६ (मासिक) ■ मूल्य ₹ २०/- ■ पृष्ठ संख्या २८
■ HINDUBODH ■ PUNE ■ VOL. 25 ■ ISSUE NO 12 ■ March 2026 (MONTHLY) ■ PRICE ₹ 20/- ■ PAGES 28





घर असो वा गाडी, शिक्षण अथवा व्यवसायवृद्धी...
तुमचे स्वप्नं साकार करायला मदत जनता बँकेची!
जनता
गृहकर्ज
योजना
व्याजदर 7.75%* च्या पुढे | ₹3 कोटींपर्यंत अर्थसहाय्य
शिक्षण व वसतिगृह शुल्क, शैक्षणिक साहित्य, इ.साठी कर्ज
जनता
एज्युफ्लेक्स
कर्ज योजना
देशांतर्गत शिक्षणासाठी
₹ 50* लाख
परदेशी शिक्षणासाठी
₹ 1* कोटी
आकर्षक व्याजदर
जनता
वाहनकर्ज
कर्ज योजना
सुलभ प्रक्रिया । त्वरित कर्जवितरण
आकर्षक व्याजदर
आता प्रत्येक व्यवहार करा 'कॅशलेस'...
कारण जनता बँक सदैव तुमच्याबरोबर!
सुरक्षित, सोपी व गतिमान
इंटरनेट बँकिंग सुविधा
व्यापारी वर्गासाठी
कार्ड स्वाईप मशिन
रोजच्या व्यवहारांसाठी
जनता रुपे डेबिट कार्ड
तुमच्या सर्वप्रकारच्या बँकिंग व्यवहारासाठी
मोबाईल बँकिंग सेवा
BHIM JetPay
we proudly supporting... Digital India
BHARAT BILLPAY
जनता सहकारी बँक लि., पुणे
मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक
टोल फ्री क्रमांक : 1800 233 3258 | www.janatabankpune.com
*अटी व नियम लागू.

मासिक

**हिंदुबोध**

**वर्ष – पंचवीस : अंक १२ वा**

शके १९४७

**मार्च २०२६**

संपादक

**श्री. रविकांत कळंबकर**

ravi.kalambkar@gmail.com

निवास

एबीसी जंक्शन, ए बिल्डींग, फ्लॅट नं. ६,
आकुर्डी रेल्वेस्टेशन जवळ,
निगडी प्राधिकरण, पुणे ४११०४४

अंक www.vhp.org संकेतस्थळावर उपलब्ध

संपादक मंडळ

श्री. किशोर चव्हाण – प्रांत मंत्री
श्री. ॲड. सतिश गोरडे – प्रांत सहमंत्री
श्री. कृष्णकांत चांडक – प्रांत कोषाध्यक्ष
श्री. श्रीपाद रामदासी – प्रांत प्रचार–प्रसार प्रमुख
श्री. संजय गोडबोले – प्रांत प्रचार–प्रसार सहप्रमुख
श्री. अनिल सांबरे – नागपूर
श्री. विजयकुमार पिसे – सोलापूर

संपादक मंडळ सदस्य

श्री. नितीन वाटकर
प्रांत जाहिरात व वर्गणीदार प्रतिनिधी

पत्र व्यवहार

व्यवस्थापक

मनोज शेलार

मो: ९०४९३९६३६३

अंकमूल्य रु. २०/–, वार्षिक वर्गणी रु. २००/–

मुद्रण स्थळ

संवाद ट्रेडप्रिंटस्, ५९५, शनिवार पेठ, पुणे – ३०.

दूरभाष : २४४८ ५६ ३२

sanwadpvt@gmail.com

## अनुक्रमणिका

✦ संपादकीय.... हिंदुत्वाची गुढी उभारुयात!
श्री. श्रीपाद रामदासी ............................. ०५

✦ वि. हिं. परिषद प्रांत वृत्त ............................................. ०७

✦ नुपेक्षी कदा राम दासाभिमानी
प्रमोद रामदासी .................................. १५

✦ अयोध्या vs व्हॅटिकन vs मक्का
व्हॉट्स ॲप वरून साभार ....................... १७

✦ आधुनिक विज्ञान – नवनिर्माण की पुनर्शोध (लेखांक २)
हणमंत नाडगौडा .................................. २०

✦ संघ स्थापनेमागचा उद्देश
डॉ. सचिन लादे ................................... १८

✦ हिंदूराष्ट्राचे परमवैभव
श्री. अमित देवधर ................................ १९

✦ महाराष्ट्र का नववर्ष – गुढ़ीपाडवा और उत्तर भारत का हिंदू नववर्ष
अतुल मालवीय ................................... २१

✦ शिवजातस्य संभाजी महाराज
श्रीपाद रामदासी.................................. २३

प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

’हिंदुबोध’ मासिक मालक, विश्व हिंदू परिषद, महाराष्ट्र प्रदेश यांचेकरिता मुद्रक व प्रकाशक विवेक सोनक यांनी संवाद ट्रेडप्रिंटस्, बी – ७, गोवईकर बिल्डिंग, ५९५ शनिवार पेठ, पुणे ४११०३० येथे छापून, भारत भवन, १३६० शुक्रवार पेठ, पुणे – ४११००२ येथे प्रकाशित केले. संपादक : रविकांत कळंबकर (पीआरबी ॲक्ट्नुसार संपादकीय जबाबदारी)

**“Hindu Bodh” Monthly publication is owned by Vishva Hindu Parishad, Maharashtra Pradesh, Printed and Published by Vivek Sonak, Printed at Sanwad TradePrints, B-7, Gowaikar Bldg. 595 Shaniwar Peth, Pune - 411030 and Published at Bharat Bhavan, 1360 Shukrawar Peth, Pune - 411002. Editor - Ravikant Kalambkar**

हिंदुबोध संबंधीचे सर्व कायदेशीर खटले अंक प्रकाशनाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत केवळ पुण्याच्या न्यायालयातच चालतील.

# वृत्तपत्राच्या मालकीहक्कासंबंधीचे निवेदन (दर महिन्यात प्रसिद्ध करावयाचे)

| | | | |
|---|---|---|---|
| १) | नियतकालिकाचे नाव | : | हिंदुबोध |
| २) | प्रकाशन स्थळ | : | भारत भवन, १३६० शुक्रवार पेठ, पुणे – ४११००२ |
| ३) | प्रकाशन काळ | : | मासिक |
| ४) | मुद्रकाचे नाव | : | विवेक सोनक राष्ट्रीयत्व : भारतीय |
| | पत्ता | : | आर. एच. – १७, फ्लॅट नं. ८, त्रिवेणी को. ऑ. हौसिंग सोसायटी, जी ब्लॉक, संभाजीनगर, चिंचवड, एम.आय.डी.सी., पुणे ४११०१९ |
| ५) | प्रकाशकाचे नाव | : | विवेक सोनक राष्ट्रीयत्व : भारतीय |
| | पत्ता | : | आर. एच. – १७, फ्लॅट नं. ८, त्रिवेणी को. ऑ. हौसिंग सोसायटी, जी ब्लॉक, संभाजीनगर, चिंचवड, एम.आय.डी.सी., पुणे ४११०१९ |
| ६) | संपादक | : | रविकांत कळंबकर राष्ट्रीयत्व : भारतीय |
| | पत्ता | : | एबीसी जंक्शन, ए बिलडिंग, फ्लॅट नं. ६, आकुर्डी रेल्वेस्टेशन जवळ, निगडी प्राधिकरण, पुणे ४११०४४. |
| ७) | मुद्रण स्थळ | : | संवाद ट्रेडप्रिंट्स, बी ७, गोवईकर बिल्डिंग, ५९५ शनिवार पेठ, पुणे ४११०३० |

८) वृत्तपत्राची मालकी हक्क/ स्वामित्व इ. चे नाव : विश्व हिंदू परिषद, महाराष्ट्र प्रदेश (ट्रस्ट)

| | | | |
|---|---|---|---|
| ९) | कार्यालयाचा पत्ता | : | 'हिंदुबोध', विश्व हिंदू परिषद कार्यालय, १३६० शुक्रवार पेठ, भारतभवन, नातूबाग, पुणे – ४११००२. |

मी विवेक सोनक घोषित करतो की वरील तपशील माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे विश्वासपात्र व सत्य आहे.

दिनांक : १ मार्च २०२६

प्रकाशक

# हिंदुत्वाची गुढी उभारुयात!

## संपादकीय

यंदा १९ मार्च रोजी हिंदू नववर्षारंभ अर्थात गुढी पाडवा, त्या निमित्ताने हिंदू समाजाबद्दल काही विचार मांडत आहोत.

बऱ्याच वेळा हिंदुत्वाबद्दल बोलत असताना, हिंदू समाज हा बहुसंख्यांक आहे परंतु एकसंध नाही असेच ऐकण्यास येते, खरे तर हिंदू एकसंध का नाही याची मीमांसा करायची तर अनेक पैलू आणि मिथके यांचा विचार करावा लागेल. एक संधतेच्या अभावाबद्दल एक मत प्रवाह असा आहे की; हिंदू मध्ये आपापसात असणारी विविधता हीच त्यांना एकसंध होऊ देत नाही. याच मुद्द्याबद्दल आपण चर्चा करणार आहोत.

हिंदू समाजामध्ये अंतर्गत विविधता आहे हे मान्य. या विविधतेचे वर्गीकरण करायचे झाले तर, भौगोलिक, पारंपरिक, भाषीक असे ढोबळ वर्गीकरण करता येईल.

असे असले तरी भौगोलिक प्रदेश बदलला म्हणून हिंदूंचा अहिंदू झाला असे होत नाही, परंपरा म्हणत असाल तर बहुतेक सण, उत्सव हे समानच आहेत. दिवाळी, दसरा, नवरात्र, गणेशोत्सव, मकर संक्रांत हे उत्सव सर्वच हिंदू साजरे करतात. पोंगल, चैत्रातल्या जत्रा, बेंदूर, बैसाखी यांसारखे सण कदाचित वेगळे असतीलहि परंतु त्यामध्ये देखील धार्मिक पूजापाठ करण्याचे साधर्म्य आहेच. दक्षिण भारतामध्ये पोंगल साजरा करताना मंदिरात जाऊन देवदर्शन घेणे गरजेचे असते तर महाराष्ट्रातील जत्रेला गावाच्या देवीचे, भैरवनाथाचे किंवा ग्रामदेवतेचे दर्शन घेणे क्रमप्राप्तच असते. याचाच अर्थ सण, उत्सव यांना असणारे हिंदू धर्माचे अधिष्ठान हा विविधतेतील सामान धागाच आहे. त्यामुळे हिंदू मधील विविधता ही त्यांना परस्परांपासून भिन्न ठरवू शकत नाही.

वास्तवात हिंदूंच्या अंतर्गत भिन्नता या विविधताच आहेत त्याला भेद म्हणता येणार नाही. असे असले तरीही प्रत्येक हिंदू हा स्वतःला वेगळा समजत असताना दिसतो. जर आपले सांस्कृतिक, भौगोलिक, पारंपरिक वैविध्य आपणांस भिन्न करत नाहीत तर मग आम्ही एकूण हिंदू म्हणून वेगवेगळे कसे ?

आता भाषा या विषयावर भाष्य करूयात, मुळात बहुभाषिक असणे हा काही केवळ भारतीय किंवा हिंदू समाज यांनाच लागू असणारी बाब नव्हे.

चीन सारख्या आर्थिक दृष्ट्या बलाढ्य असणाऱ्या राष्ट्रामध्ये ३०० हुन अधिक भाषा बोलल्या जातात, अमेरिकेमध्ये हाच आकडा ३५० आहे. पाकिस्तान सारख्या धर्मधिष्ठित राष्ट्रामध्ये देखील ७० भाषा बोलल्या जातात, तर अरब राष्ट्रांमध्ये ३० हुन अधिक भाषा बोलल्या जातात. एकूणच काय तर एकाच धर्माचे असणाऱ्या राष्ट्रांमध्ये देखील बहुभाषिकता आढळते. त्यामुळे भाषिक भिन्नता ही कोणत्याही धर्मियांना परस्पराहून धार्मिकदृष्ट्या भिन्न करत नाही.

सांप्रदायिक भिन्नता हा बिंदू आता पाहुयात. पंथ–उपपंथ, संप्रदाय हा काही केवळ हिंदू धर्मियांचाच घटक आहे असे नाही.

कोणत्याही धर्मामध्ये, धारणांच्या मतांतरावरून पंथ, उपपंथ निर्माण होतच असतातच, इस्लामचेच उदाहरण घ्याना; त्यांच्या मध्येही, शिया सुन्नी, सुफी, अहमदिया असे पंथ आहेतच की. तसेच ख्रिश्चनिटी मध्ये प्रोटेस्टंट, कॅथलिक आणि ऑर्थोडॉक्स या सारखे पंथ आहेतच. परंतु म्हणून ते काही परस्परांपासून धार्मिक दृष्ट्या भिन्न नाहीत. मग हिंदू तरी भिन्न कसे असतील.

हिंदूंच्या बाबतीत आणखी खोलात गेल्यावर असे आढळते की; आपल्यातल्या भिन्नतेला भेद समजून आजचा हिंदू समाज हा एकला चालो रे च्या भावनेत वावरताना दिसतो. आपला संप्रदाय, पूजा पद्धती, भाषा हाच आमचा धर्म होय असा गैरसमज करून घेतल्याने त्या त्या बाबतीतले नेतृत्व हेच अंतिम नेतृत्व मानले जाते. धार्मिक नेतृत्व भिन्नतेमुळे अखेर राजकीय नेतृत्व हेच आपले धार्मिक नेतृत्व आहे असे मानून जे खरे धार्मिक नेतृत्व आहे अश्या साधू संतांकडे दुर्लक्ष केले जाते. अहिंदू धर्मीयांची प्रार्थनास्थळे, धर्मस्थळे हीच त्यांची शक्ती स्थळे मानली जातात, त्या त्या धार्मिक संतांच्या तत्वज्ञानाला एकसूत्री धर्मज्ञान मानून त्याला स्वीकारले जाते. हिंदू मात्र आपली खरी शक्तीस्थळे असणाऱ्या मंदिरांना केवळ अध्यात्मिक केंद्रे किंवा पुजाऱ्यांची

पोटे भरणाऱ्या संस्था असे म्हणून तिकडे पाठ फिरवतो. त्यामुळे मंदिर, मठ यांच्याद्वारे निर्माण होत असणाऱ्या धार्मिक नेतृत्वाना हिंदू समाज आज नाकारताना दिसतो आहे. अगदी काही दिवसापूर्वीचेच उदाहरण घ्या ना! प्रयागराज येथे सुरु असणाऱ्या महाकुंभ मेळ्याच्या निमित्ताने, विश्व हिंदू परिषदेच्या मंचावरून संतांनी काही बैठकीचे निर्णय जाहीर केले त्यामध्ये त्यांनी, लोकसंख्या समतोल होण्याकरता हिंदू कुटुंबामध्ये तीन अपत्ये असण्याची आवश्यकता बोलून दाखवली. दुर्दैवाने या आवाहनाचा हिंदूंनीच गैर अर्थ घेत, संतांचीच अक्कल काढायचा अति शहाणपणा दाखवला (अर्थात हे काही जाहीरपणे कोणी बोलले नाही परंतु आमच्या सोबत झालेल्या वैयक्तिक चर्चेच्या आधारावर आम्ही सांगत आहोत). अन्य धर्मीय आणि हिंदू यामधील असणाऱ्या शैक्षणिक प्रमाणाचा दाखला देऊन हा निर्णय किंवा आवाहन गैर आहे असा सूर लावला. परंतु हिंदूंनी या प्रकारची पार्श्वभूमी समजून घेणे आवश्यक आहे, OECD (Organisation for Economic Co-operation and Development) च्या निष्कर्षानुसार एखादा समाज किंवा एखादी पिढी आहे तशीच परावर्तित होण्यासाठी आवश्यक जन्मदर हा २.१ प्रति स्त्री असणे आवश्यक आहे. परंतु हिंदूंचा जन्मदर हा २०१९ ते २०२१ च्या पाहणीनुसार १.९४ एवढा आहे. मागील २० वर्षांचा विचार करता हा दर ३.३ इतका कमी झाला आहे आणि त्यामुळे हे जर असेच चालू राहिले तर येणाऱ्या काही वर्षांमध्ये हिंदू समाज हा संपूर्णपणे नष्ट होण्याची शक्यता आहे.(१)

तर दुसरीकडे मुस्लिम समाजाचा जन्मदर २.३६ इतका आहे (जो देशातील सर्वाधिक आहे) १९९२ च्या तुलनेत हा दर केवळ २.०५ इतका कमी झाला आहे.(२)

म्हणजेच हिंदूंच्या तुलनेत हा १.२५ ने जास्तच आहे. आणि म्हणून किमान हिंदू समाज आहे तितक्या प्रमाणात तरी शिल्लक राहावा या साठी हिंदू कुटुंबामध्ये २.१ म्हणजे ३ अपत्ये जन्माला येणे गरजेचे आहे असा त्याचा अर्थ आहे. परंतु संतांच्या अभ्यासाचा गैर अर्थ घेत, विषयाचे गांभीर्य समजून घेता हिंदू समाजामध्ये हा विषय चेष्टेचा ठरवला जात आहे.

वर सांगितल्या प्रमाणे, हिंदूंना संतांचे मार्गदर्शन आणि पर्यायाने नेतृत्व मान्यच करायचे नसल्याने, संतांच्या हिंदू समाज रक्षणाच्या तळमळीचे भानच राहिले नाही.

याच बैठकीमधील आणखी एक निर्णय म्हणजे मंदिरांना सरकारी नियंत्रणातून मुक्त करून, मंदिर व्यवस्थापनाकडे देण्याची मागणी. या यामागील उद्देश्य हा अगदी साधा आणि सरळ आहे तो म्हणजे की, हिंदू धर्मस्थळाद्वारे संकलित होणारे हिंदू भक्तांचे द्रव्य किंवा पैसा हे केवळ हिंदू धर्मियांच्याच कल्याणार्थ वापरले जावेत.

खरे तर ही मागणी काही आजची नाही आणि मुख्य म्हणजे कायद्याला धरून असणारच ही मागणी आहे. १९५९ साली नव्याने पारित केलेल्या कायद्यानुसार ठराविक म्हणजे श्रीमंत अश्या हिंदू देवस्थानावर सरकारी नियंत्रण ही बाब संविधानातील कलम २५ आणि २६ अनुसार प्राप्त असणाऱ्या धर्मस्वातंत्र्यावर घाला आहे. दुसरे असे की; हा कायदा केवळ हिंदू धर्मस्थळांवरच लागू करण्यात आलेला आहे. या मागे तत्कालीन सरकारचे असणारे मतांचे राजकारण हेच याचे मूळ आहे. हिंदू भक्त आपल्या धर्मसाठी जे दान देतात त्यांना सरकारी नियंत्रणात घेऊन त्याचे राजकीय लाभा करता अहिंदूंना होणारे वाटप ही बाब कोणत्याही सजग हिंदूंना पटण्यासारखी नाही. आणि म्हणूनच आमच्या संतांनी आवाहन केले आहे की; हिंदू मंदिरांचे सरकारीकरण बंद झाले पाहिजे.

हिंदूंचे दुर्दैव हेच आहे की; मंदिरे ही पुजाऱ्यांची पोट भरण्याची साधने आहेत असे डावे आणि छद्म समाजवादी विचार ज्या हिंदूंच्या नसानसात पद्धतशीरपणे भरले गेले आहेत त्यांना या मागणीची भूमिकाच समजत नाही. त्यामुळे आपल्याच धार्मिक नेतृत्वाच्या मागणीला आपलेच हिंदू परिजन उपहासाने घेत असलेले दिसत आहेत.

एकंदरीत काय तर, केवळ आपल्या साधू संतांवर, संघटनात्मक क्षेत्रात काम करणाऱ्या नेतृत्वावर अविश्वास दाखवून, आजचा हिंदू समाज स्वतःला निर्नायकी होताना दिसतो आहे. आणि लक्षात ठेवा समाजाचा लढा जेंव्हा निर्नायकी होतो तेंव्हा त्या समाजाचा पराभव हा अटळ आणि अटळच असतो.

आणि म्हणूनच केवळ आणि केवळ हिंदू हितासाठी कार्यरत असणाऱ्या संघटनांवर केवळ विश्वास न ठेवता, त्यांच्या पाठीशी भक्कम पणे उभे रहा, प्रत्यक्ष सहभागी नाही आले तर निदान त्यांचे समर्थक म्हणून वेळप्रसंगी उभे रहा. तेही नाही जमले तर निदान आर्थिक सहयोग करा किमान त्यांना विरोध तरी करू नका.

यंदाच्या गुढी पाडव्याला केवळ रेशमी वस्त्राची गुढी न उभारता हिंदुत्वाची गुढी उभारूया आणि हिंदुहितासाठी एक पाऊल पुढे टाकूया !

**श्री. श्रीपाद श्रीकांत रामदासी**



# हळदी कुंकू कार्यक्रम : हडपसर जिल्हा

रविवार दिनांक २५ जानेवारी २०२६ रोजी, हडपसर जिल्ह्यातील सातववाडी प्रखंड येथील मल्लिकार्जुन महादेव मंदिर येथे, मातृशक्ती यांच्या वतीने मकर संक्रांति आणि रथसप्तमीच्या निमित्त माता–भगिनी यांचे करिता भव्य हळदी कुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यक्रमास मातृशक्ती प्रांत संयोजिका, सौ. प्रियाताई रसाळ, व दुर्गा वाहिनी विभाग संयोजिका, सौ. सुरेखाताई कवडे, जिल्हा उपाध्यक्ष, अँड. श्री. मनोज काळे, जिल्हा मंत्री, श्री राजेंद्र शेवाळे, जिल्हा सहमंत्री, श्री. शशिकांत घाटे, प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन, प्रतिमा पूजन, त्रिवार ओंकार, एकात्मता मंत्र व विजय महामंत्र घेऊन करण्यात आली. यावेळी आलेल्या सर्व माता–भगिनी यांचे स्वागत व प्रास्ताविक जिल्हा मंत्री, श्री. राजेंद्र शेवाळे यांनी केले.

त्यानंतर प्रांत मातृशक्ती संयोजिका,सौ.प्रियाताई रसाळ यांनी आपले मनोगत व्यक्त करत असताना सांगितले की, मकर संक्रांति आणि हळदीकुंकू यांचे महत्त्व त्याचबरोबर विश्व हिंदू परिषद या सर्व उपक्रमाबाबत करत असलेले कार्य सविस्तर विशद केले.

त्याचबरोबर त्यापुढे म्हणाल्या की, मकर संक्रांत हा केवळ एक सण नाही, तर आपल्या संस्कृतीचा, परंपरांचा आणि स्नेहाचा एक सुंदर संगम आहे. परंपरेचे महत्त्व आणि वैज्ञानिक दृष्टिकोन आहे. सांस्कृतिक हळदी–कुंकू हा आपल्या हिंदूंचा एक अविभाज्य भाग आहे. हा कार्यक्रम आपल्याला एकत्र आणतो, नाती दृढ करतो आणि सामाजिक बंध मजबूत करतो.

हळद आणि कुंकू लावल्याने वातावरण शुद्ध राहते. सुवासिनींना आपण साक्षात आदिशक्तीचे रूप मानतो. हळद–कुंकू लावताना त्यातील आदिशक्ती जागृत होते, अशी आपली श्रद्धा आहे.

हळदी–कुंकवाचा सामाजिक आणि भावनिक पैलू म्हणजे एकत्र येण्याची संधी आहे. आजच्या धावपळीच्या जीवनात एकमेकींना भेटण्याची, गप्पा मारण्याची आणि सुख दुःखाची देवाणघेवाण करण्याची ही एक उत्तम संधी आहे. त्याचबरोबर सकारात्मक संदेश आहे तिळगुळ वाटून आपण 'तिळगुळ घ्या, गोड बोला' म्हणतो. हे नवीन वर्षात कटुता विसरून प्रेमाने आणि सौहार्दाने राहण्याचा संदेश देतो.

समारोप व आभार व्यक्त करत असताना दुर्गावाहिनी पुणे पूर्व विभाग संयोजिका, सौ.सुरेखाताई कवडे, या म्हणाल्या की, या कार्यक्रमाच्या निमित्ताने आपण सर्वजणी एकत्र अलोत. या मंगल प्रसंगी सर्वांनी एकमेकींना हळद–कुंकू लावून सौभाग्य आणि समृद्धीसाठी प्रार्थना करूया. त्याचबरोबर, आपण एकमेकींना देत असलेले वाण हे केवळ (वस्तू) नसून, ते आपले प्रेम, आपुलकी आणि शुभेच्छा आहेत. या वाणासोबतच एकमेकींना मतुमचे सौभाग्य अक्षय्य राहोफ अशी प्रार्थना करूया.

चला, या परंपरेला पुढे नेऊया, नाती अधिक घट्ट करूया आणि आनंदाचे क्षण साजरे करूया. आलेल्या सर्व माता–भगिनी यांना हळदी–कुंकू आणि वाण (वस्तू) देऊन मातृशक्ती जिल्हा सहसंयोजिका, सौ. पुष्पलताताई गावडे, आणि दुर्गावाहिनी जिल्हा बाल संस्कार प्रमुख, सौ. मेघाताई रामदवे यांनी सन्मान केला. सदर कार्यक्रम यशस्वी होणे करिता, विश्व समन्वयक, श्री. महेश कंठाळे, जिल्हा कार्यकारणी सदस्य, श्री.आबासाहेब गायकवाड, सातववाडी प्रखंड मंत्री, श्री.राहुल मोडक, छत्रपती संभाजी महाराज प्रखंड मंत्री, श्री.विवेक रामदवे, श्री. श्रीराम ईश्वर सूर्यवंशी, कु. शिवम राहुल मोडक यांनी मोलाचे सहकार्य केले. व उपस्थित राहून व्यवस्था करिता सहकार्य केले.

संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन मातृशक्ती जिल्हा सहसंयोजिका, सौ. पुष्पलताताई गावडे यांनी केले होते. भारत माता आरती,शांती मंत्र व राष्ट्रीय उद्घोष घेऊन समारोप करण्यात आला. उपस्थित महिला भगिनी संख्या :–१४०

**श्री. राजेंद्र शेवाळे, मंत्री हडपसर जिल्हा**




# विश्व हिंदू परिषद, बजरंग दल
# कात्रज जिल्हा : शौर्य संचलन

दि. १ फेब्रुवारी २०१६ रोजी शौर्य संचलनाची सुरुवात सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास जांभुळवाडी रोड आंबेगाव मैदानावर भगवा ध्वजारोहण करून झाली. सदरच्या शौर्य संचलनाचा प्रारंभ जांभूळ वाडी रोड मैदान येथून सुरवात करून, दत्त नगर चौक, शनी नगर चौक नंतर पुन्हा मैदान. असा झाला.

शिस्तबद्ध शौर्य संचलन पाहण्यासाठी नागरिकांनी रस्त्याच्या कडेला दुतर्फा रांगा केल्या होत्या. चौकाचौकात नागरिकांनी व व्यापारी बांधवांनी , हितचिंतकांनी मोठ्या प्रमाणात पुष्पवृष्टी केली. अक्षरशः पोलीस बांधवाना सुद्धा या क्षणी सेल्फी घेण्याचा मोह आवरता आला नाही संचलनाच्या समोरून त्यांनी सेल्फी घेतल्या इतक्या शिस्तबद्ध पद्धतीने संचलन झाले. परिसरात पहिल्यांदाच असे संचलन निघाल्याने नागरिक गाड्या थांबवून हा क्षण पहात होते जणू काही त्यांच्या मनात एक आत्मविश्वास दिसत होता की या भागात सुद्धा बजरंग दल हिंदूंच्या रक्षणासाठी आहे, भगवान श्री राम, भारत माता, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या घोषणांनी संचलन झाले.

शौर्य संचलनाचा समारोप कार्यक्रमाची सुरुवात भारतमाता व श्री प्रभु रामचंद्रांच्या प्रतिमेचे पूजन करून मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलनाने झाली.

यावेळी सर्व मान्यवर पाहुण्यांचा परिचय जिल्हा बजरंग संयोजक श्री. आशिष दुसाने यांनी केला, त्यानंतर कार्यक्रमास सुरुवात झाली. विश्व हिंदू परिषद कात्रज जिल्ह्याचे जिल्हा मंत्री श्री. शार्दूल ठाकूर यांनी प्रास्तविक केले. जिल्ह्यातील बजरंग दला च्या उपलब्धी त्यांनी सांगीतल्या. कात्रज भागात लवकरच बजरंग दलाचे बलोपासना केंद्र चालू करण्यासाठी प्रयत्न करु असंही त्यांनी सांगितले.

त्यानंतर प्रांत सह संयोजक श्री. संदेश जी भेगडे यांनी बजरंग दलाची रचनात्मक कार्य करण्याची पद्धती अगदी थोडक्यात स्पष्ट पणे सांगितली व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

त्यानंतर प्रांत सह मंत्री श्री. नितीन जी वाटकर यांनि हिंदू वरील इतिहासातील अत्याचार भविष्यातील धोके यावर कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले, लव जिहाद, धर्मांतरण व मुस्लिम वोट बँकेच्या जिहाद्यांना धडा शिकविण्यासाठी युवकांनी विश्व हिंदू परिषदेच्या बजरंग दलामध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन प्रांत सह मंत्री श्री नितीन जी वाटकर यांनी केले.

त्यानंतर बजरंग दलाची शाखा लागली प्रार्थना झाली सायंकाळी आठ च्या सुमारास राम खिचडीच्या प्रसादाने शौर्य संचलनाच्या कार्यक्रमाची सांगता झाली.

या कार्यक्रमास पश्चिम महाराष्ट्र विश्व हिंदू परिषद चे प्रांत सह मंत्री श्री नितिन जी वाटकर, प्रांत बजरंग दलाचे सह संयोजक श्री संदेश जी भेगडे, जिल्हा मंत्री श्री शार्दूल ठाकूर राष्ट्रीय स्व संघाचे भाग कार्यवाह श्री कुंदन जी चौधरी, जिल्हा सह मंत्री श्री ज्ञानेश्वर इंगळे व राजेंद्र देशपांडे, जिल्हा बजरंग दल सह संयोजक श्री आशिष जी दुसाने, विशेष समर्क प्रमुख गणेश चव्हाण, प्रचार प्रसिद्धी प्रमुख श्री राहुल मारवाल, धर्मप्रसार प्रमुख विजय घायतीडक, प्रखंड मंत्री श्री सुजित गुरव, सागर भंडारे, कुणाल जोशी, सह मंत्री श्री श्रीराम शेम्बडे, बजरंग दल संयोजक – श्री मंगेश जी कुंजीर, ओम शहा, राघव सितारे, मातृशक्ती संयोजिका माळवदकर ताई, दुर्गवाहिनी संयोजिका खुशी धावरे, व जिल्ह्यातील सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

**जिल्हा मंत्री, शार्दूल ठाकूर**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे स्टाफ वेल्फेअर असोसिएशन**



## विश्व हिंदू परिषदेच्या पहिल्या कारसेविका प्रभावती सारोळकर निवर्तल्या

सोलापूर : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक स्व. बापुराव उर्फ भास्करराव सारोळकर यांच्या धर्मपत्नी तसेच विश्व हिंदू परिषदेच्या पहिल्या कारसेविका तसेच पहिल्या माजी महिला जिल्हामंत्री तथा विहिंप गोसंवर्धन आयामाचे जिल्हा प्रमुख अमित सारोळकर यांच्या मातोश्री प्रभावती सारोळकर (वय ९२ वर्षे) यांचे सोमवारी वार्धक्याने निधन झाले.

तीर्थक्षेत्र अयोध्या येथील श्रीप्रभु रामचंद्राच्या जन्मभूमी आंदोलनात कारसेवक म्हणून सक्रिय भाग घेतल्या होत्या. तसेच विश्व हिंदु परिषदेच्या पहिल्या महिला जिल्हा मंत्री म्हणून त्यांनी काम केले होते.

सोलापूर जिल्ह्यातील विश्व हिंदू परिषदेच्या सर्व कार्यकर्त्यांसाठी त्या केवळ मार्गदर्शक नव्हत्या,तर खऱ्या अर्थाने मातृवत आधारस्तंभ होत्या. परिषदेची सर्वांगीण माहिती, संघटनात्मक रचना, कार्यपद्धतीची सखोल जाण आणि कार्यकर्त्यांशी असलेली आत्मीय नाळ यामुळे त्या एक उत्तम संघटिका म्हणून ओळखल्या जात.कोणत्याही विषयावर योग्य दिशा देणे,कार्यकर्त्यांचे मनोबल वाढवणे आणि संघटनेचा दृष्टिकोन स्पष्ट करणे हे त्यांच्या स्वभावातःच होते.

परिषदेच्या दृष्टिकोनानुसार मातृशक्ती ही समाजजीवनाचा कणा आहे, या भूमिकेतून प्रभावतीताईंनी सुरुवातीपासूनच निर्भीडपणे काम केले.त्या काळात मातृशक्तीचा संघटनात्मक सहभाग मर्यादित असताना त्यांनी जबाबदारी स्वीकारून धर्मकार्य,श्रीराम जन्मभूमी आंदोलन नेतृत्व,गोसंवर्धन, समाजजागृती आणि संघटन विस्तार या क्षेत्रांत मोलाचे योगदान दिले.

त्यांच्या सहवासात घडलेले अनेक स्वयंसेवक आज विविध जबाबदाऱ्या सांभाळत आहेत,त्यांचे सर्व कुटुंब परिषदेच्या कार्यात सक्रिय आहे.हीच त्यांच्या कार्याची खरी फलश्रुती आहे.सोलापूर जिल्ह्यासह संपूर्ण परिषदेच्या संघटन जीवनात त्यांच्या जाण्याने मोठी हानी झाली आहे. त्यांचे पती स्वर्गीय बापूराव सारोळकर यांच्या प्रमाणेच त्यांनी एका कार्यक्रमात मृत्यूपूर्वीच शासकीय रुग्णालयास देहदान करण्याचा संकल्प केला होता.त्या संकल्पाची पूर्तता त्यांचे चिरंजीव अमित सारोळकर यांनी अंत्यविधीसाठी आलेल्या आप्तेष्टांशी विचारविनिमय करून कुंभारी येथील रुग्णालयाशी संपर्क करुन कागदपत्रांची पूर्तता केली सोमवारी रात्री साडेआठ च्या सुमारास रुग्णालयास देह सुपूर्द करण्यात आला. याप्रसंगी विहिंप पदाधिकारी व संघ परिवारातील सदस्य उपस्थित होते.

ईश्वर त्यांच्या पवित्र आत्म्यास सद्गती देवो. विहिंपच्या वतीने त्यांच्या स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली : विष्णू जगताप, जिल्हा सहमंत्री


विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!

**जनता बँक पुणे कला क्रिडा मंडळ**



विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!

**जनता वेल्फेअर सोसायटी**



## विहिंप सामाजिक समरसता यात्रेचा पंढरपुरात समारोप

**मेहतर कॉलनी, चंद्रभागा वाळवंटात कोळी समाजातर्फे समरसता अभियानाचे स्वागत**

पंढरपूर : विश्व हिंदू परिषदच्या वतीने पंढरपूरमध्ये सामाजिक समरसता यात्रा अभियानातून हिंदू सारा एक हा संदेश देण्यात आला. मेहतर कॉलनी येथे यात्रेचा समारोप झाला. तत्पूर्वी चंद्रभागा वाळवंट कोळी समाजाचे वतीने नगराध्यक्षा प्रणिता भालके आणि कोळी समाजाचे नेते गणेश अंकुशराव यांनी समरसता यात्रेचे स्वागत करण्यात आले.

पंढरपूर विश्व हिंदू परिषद वतीने जाती पाती छोडो और सारे हिंदू जोडो आशा घोषणा देत समरसता यात्रा रथ पंढरपुरातील मेहतर कॉलनी येथे दाखल झाली. या समरसता यात्रेचा शुभारंभ सोलापूर जिल्ह्यात अक्कलकोट तालुक्यात किणी मोड बंजारा तांडा येथे संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आला. त्यानंतर वळसंग, कुंभारी सोलापूर शहरातील सलगर वस्ती रामवाडी विठ्ठल मंदिर, इंचगिरी मठ, मार्कंडेय मंदिर, सिंधी कॉलनीत जयशंकर आश्रम, अंत्रोळीकर नगर येथे गुरूद्वारा, लोधी समाज शीतलादेवी मंदिर, मोची समाज जांब मुनी चौक, शिवस्मारक येथे छत्रपती शिवरायांना अभिवादन करून बार्शीकडे मार्गस्थ झाली.

बार्शी, कुर्डुवाडी, अरण, मंगळवेढा मार्गे पंढरी नगरीत समरसता यात्रा दाखल झाली .मेहतर कॉलनी येथे समारोपाच्या कार्यक्रमात नरेश पाटील, प्राचार्य गजानन धरणे, किशोर चव्हाण यांनी समरसतेविषयी विचार व्यक्त केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. हेडगेवार यांनी सामाजिक न्यायासह हिंदू समाजात परस्पर सन्मान आणि समानता निर्माण व्हावी यासाठीच कार्य केले. अस्पृश्यता आणि जातीभेद मिटवण्यासाठी विश्व हिंदू परिषदेने अनेक आंदोलने आणि सामाजिक उपक्रम राबवले.या समरसता यात्रेतून गावागावातील सर्वच मंदिरातून सर्व जातींना प्रवेश, एक़ गाव एक पाणवठा तसेच एक गाव एक स्मशान तसेच सनातन राष्ट्र, कन्या–भगिनी, मंदिर–संत यांचे रक्षण करणे, सामाजिक व्यवहारातून अस्पृश्यता आणि उच्चनीचता संपवणे आणि समर्थ राष्ट्राची निर्मिती करून हिंदू सारा एक हा भाव मनामध्ये प्रकट करण्याचा संदेश सर्व हिंदू बांधवांना उपस्थित मान्यवरांनी दिला. यावेळी विश्व हिंदू परिषद महाराष्ट्र आणि गोवा क्षेत्रीय समरसता आयाम प्रमुख नरेशी पाटील (मुंबई), प्रांतअध्यक्ष प्राचार्य गजानन धरणे, प्रांत मंत्री किशोर चव्हाण (पुणे), प्रांत समरसता प्रमुख निखिलजी कुलकर्णी(पुणे), विभाग सहमंत्री विजयकुमार पिसे, समरसता प्रांत सदस्य रवींद्र साळे, जिल्हा सहमंत्री गोपाळ सुरवसे, बजरंग दल जिल्हा संयोजक श्रीनाथ संगीतराव, नगरसेवक सौरभ थिटे, मेहतर समाजाचे नेते अंबादास दोडिया, मातृशक्ति विभाग संयोजिका मालती गंभीर, तुकाराम खंदाडे आदी प्रमुख मंडळी उपस्थित होती.

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक गणेशोत्सव मंडळ**

संवाद

**संवाद ट्रेडप्रिंट्स**

**छपाई क्षेत्रातील एक दर्जेदार सचोटीपूर्ण व्यवहार**

**बी–७, गोवईकर इमारत, शनिवार पेठ, पुणे – ३० दूरध्वनी : (०२०) २४४८५६३२**

**Email : sanwadpvt@gmail.com**




# विश्व हिंदू परिषदेचे सामाजिक समरसता अभियान यात्रेचा अक्कलकोटमधून शुभारंभ

**जाती पाती तोडेंगे, सारे हिंदू जोडेंगे! समरस हिंदू समर्थ भारत : अनिरुध्द पंडित**

अक्कलकोट : भारताला विश्व गुरु बनविण्यासाठी जातीपातीत भेदाभेद न मानता विश्व हिंदू परिषदेच्या सामाजिक समरसता अभियान यात्रेत समस्त हिंदूंनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन विश्व हिंदू परिषदेचे मुंबई क्षेत्र (महाराष्ट्र/गोवा) संघटनमंत्री अनिरुद्ध तथा अण्णा पंडित यांनी केले.

अक्कलकोट : आगामी काळात भारताला विश्व गुरु बनविण्यासाठी सर्व हिंदू बांधवांनी हिंदू धर्मातील जाती पाती मध्ये भेदाभेद न मानता विश्व हिंदू परिषदेच्या सामाजिक समरसता अभियानाच्या कार्यात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे प्रतिपादन विश्व हिंदू परिषद मुंबई क्षेत्राचे संघटनमंत्री अनिरुद्ध पंडित यांनी केले आहे. विहिंप प.महाराष्ट्र प्रांत सामाजिक समरसता अभियान यात्रेचा शुभारंभ अक्कलकोट तालुक्यातील सांगवी जवळील किणी मोड लमाणतांडा येथून झाला. प्रारंभी संत सेवालाल महाराज व जगदंबा मातेच्या मूर्तीचे पूजन प्रमुख मान्यवरांच्या हस्ते झाले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे विहिंप प. महाराष्ट्र प्रांत अध्यक्ष प्रा.गजानन धरणे, सामाजिक समरसता प्रमुख निखिल कुलकर्णी, विभाग सहमंत्री तथा यात्रा प्रमुख विजयकुमार पिसे, जिल्हाध्यक्ष अभिमन्यू डोंगरे महाराज, ॲड. संकेत राव, जिल्हाप्रमुख चंद्रकांत कुलकर्णी, संजयकुमार जमादार, जिल्हा सहमंत्री विष्णू जगताप,सहप्रमुख विकास कुलकर्णी, बजरंग दल सहसंयोजक अभय कुलथे,सह संयोजक अनिल कोळी, अक्कलकोट प्रखंड मंत्री मेजर बालाजी राजपूत आणि बजरंग दल संयोजक मदन राठोड आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी लमाण समाजाच्या पारंपारिक रुढी नुसार सेवालाल महाराज व आई जगदंबेच्या मंदिरासमोर होमहवन प्रसादाची आहुती दिली. तसेच सामाजिक समरसता अभियाना निमित्त सजावट केलेल्या चित्ररथाची विधीवत पूजा झाली.

जातीपातीत अस्पृश्यता न मानता सर्वांना हिंदुत्वाच्या आधारावर,एकत्रित येवून विखुरलेल्या समाजाला एकसंध करण्याचे काम विश्व हिंदू परिषदेच्या माध्यमातून गत ६१ वर्षापासून सुरू असल्याचे मुंबई क्षेत्र संघटनमंत्री अनिरुद्ध पंडित यांनी सांगितले.

भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी, खऱ्या अर्थाने आपल्या क्रांतिकारक योध्यासोबत आपल्या जीवाची पर्वा न करता भटक्या जाती जमाती मधील ही क्रांतीकारांनी हिरारीने भाग घेवून परकीय आक्रमणे रोखण्यासाठी युद्ध भूमीवर लढाया केल्या. समाज एकसंध करण्याकरिता विहिंप सामाजिक समरसता अभियानाच्या कार्यात सर्व हिंदूंनी संघटित व्हावे, असे प्रतिपादन प्रांताध्यक्ष प्रा.गजानन धरणे यांनी केले.

आम्ही सर्व हिंदू एक आहोत हा संदेश हिंदूंच्या वंचित घटकांपर्यंत पोहचण्यासाठीच असे अभियान सुरू केले असल्याची माहिती विश्व हिंदू परिषद पश्चिम महाराष्ट्र प्रांताच्या सामाजिक समरसता अभियानाचे प्रांत प्रमुख निखिल कुलकर्णी यांनी याप्रसंगी बोलताना दिली. सामाजिक समरसता अभियानाच्या चित्ररथाचे उद्घाटन प्रा. गजानन धरणे, मुंबई क्षेत्राचे संघटनमंत्री अनिरुद्ध पंडित यांचे हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले.

या कार्यक्रमास रामचंद्र राठोड पुजारी, राजु चव्हाण, मेघराज राठोड, चंदु बंदिछोडे, रवि राठोड, रमेश जाधव, बिराप्पा बंदिछोडे, देवेंद्र बंदिछोडे, हरीदास राठोड, सुरेश बंदिछोडे, जालींदर कदम, रविंद्र राठोड, देविदास राठोड, गोपीनाथ चव्हाण कारभारी, बाबु राठोड, निलु राठोड, पिंटू चव्हाण कारभारी, मदनकुमार राठोड, ज्ञानेश्वर पाटील व किणीमोड लमाण तांड्या वरील ग्रामस्थ उपस्थित होते. त्यानंतर चित्ररथाचे अक्कलकोट शहरातील बेडर समाजाच्या वतीने श्री मरीआई मंदिरात धर्मराज गुंजले, शिवराज मलवे, सचिन कुर्ले, नागेश मिलगले, सुरज कुर्ले, सुनिता मिलायली, सुगलाबाई मिनगले यांनी स्वागत केले. मान्यवरांच्या शुभहस्ते बेडर समाजाचे आराध्यदैवत श्री मरीआई व बेडर कन्नय्या ची विधीवत पूजाअर्चा करण्यात आली. त्यावेळी या यात्रेसंदर्भात मार्गदर्शन प्रा. गजानन धरणे व निखिल कुलकर्णी यांनी केले.

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे स्टाफ वेल्फेअर असोसिएशन**



## समाजाच्या सर्व स्तरात विहिंपचे कार्य पोहोचविण्याची गरज

### संवाद सेतू उपक्रमप्रसंगी संजय ढवळीकर यांचे प्रतिपादन

सोलापूर : विश्व हिंदू परिषदेचे कार्य विश्व्यापी आहे. अनेक देशांमध्ये हिंदू राहतात, त्यांच्यासाठी देखील विहिंपचे कार्य सुरू आहे. समाजाच्या सर्व स्तरात विहिंपचे कार्य पोहोचवले पाहिजे. गैरसमज दूर केले पाहिजेत, असे विचार विहिंपचे विशेष संपर्क आयामाचे झोन प्रमुख संजय ढवळीकर (ठाणे) यांनी व्यक्त केले.

विश्व हिंदू परिषद विशेष संपर्क अभियानच्या वतीने सोलापुरात संवाद सेतू कार्यक्रमाचे आयोजन केले होते. याप्रसंगी व्यासपीठावर केंद्रीय गोरक्षा संवर्धन प्रमुख भाउराव कुदळे, प्रांत मंत्री किशोर चव्हाण, जिल्हा मंत्री संजय जमादार उपस्थित होते. ढवळीकर यांनी भारतीय अर्थव्यवस्थेचे विश्व पातळीवर झालेली प्रगती विशद केली. लोकांना फक्त बजरंग दल आणि राम मंदिर आंदोलन माहीत आहे, राज्यात आणि देशभरात अनेक सेवा कार्य सुरू आहेत. शिवाय अन्य आयामाचे काम लोकांपर्यंत पोहोचवून त्यांच्या कार्याची ओळख करून देण्याची आवश्यकता आहे पाहिजे. लोकसंख्येमुळे डेमोग्राफी बदलते, हा धोका ओळखला पाहिजे, याकडे ढवळीकर यांनी लक्ष घातले पाहिजे.

प्रांत मंत्री किशोर चव्हाण यांनी संवाद सेतू च्या माध्यमातून हिंदू समाजातील विविध जाती,ज्ञाती, संस्था यांचा समन्वय घडवून आणण्यासाठी विशेष संपर्क अभियानातून भेदाभेद दूर करण्याचे काय सुरू आहे, अशी माहिती सांगितली.

संवाद सेतू उपक्रमास प्रांत धर्माचाय संपर्क प्रमुख नागनाथ बोंगरगे, विभाग सहमंत्री विजयकुमार पिसे, संपर्क विभाग प्रांत सदस्य पुरुषोत्तम उडता,जिल्हा सहमंत्री बाबू जी गिरगल, बजरंग दल सहसंयोजक अभय कुलथे, धर्म प्रसार आाम प्रमुख जयदेव सुरवसे, समरसता आयाम प्रमुख चंद्रकांत कुलकर्णी तसेच शहर आणि ग्रामीण भागातील अनेक मान्यवर प्रतिष्ठित मंडळी बहुसंख्येने उपस्थित होती.



## विशेष संपर्क विभागाचा प्रशिक्षण वर्ग उत्साहात संपन्न.

प्रांत प्रशिक्षण वर्ग श्री क्षेत्र अक्कलकोट, जिल्हा सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. एकूण दीड दिवसाच्या वर्गाचे उद्घाटन केंद्रीय विशेष संपर्काचे प्रमुख मा.श्री. अंबारीशजी, वि हिं प प्रांत अध्यक्ष मा.श्री.गजानन धरणे सर विशेष संपर्क विभागाचे क्षेत्र प्रमुख श्री संजय राव ढवळीकर, प्रांत विशेष संपर्क प्रमुख श्री श्रीकांत पोतनीस, विभाग सहमंत्री श्री विजय पिसे यांच्या हस्ते झाले.

उद्घाटन सत्रामध्ये मा. श्री. अंबरीश जी, श्री. संजयराव ढवळीकर यांनी मार्गदर्शन केले. मा.अंबरीशजींनी येत्या काळातील वाढलेल्या सामाजिक समस्या कथन करताना विश्व हिंदू परिषदेची वाढलेली जबाबदारी आणि आव्हाने याविषयी उहापोह केला. सामाजिक पुंज मधील नविन विविध आयमात विशेष संपर्क विभागातील करणीय कामे आणि उद्धीष्ट्ये या विषयी विस्तृत माहिती देताना आपल्या ओघवत्या वाणीत काही उदाहरणे देत विशेष संपर्क विभाग कसा असावा याविषयी मार्गदर्शन केलें.

श्री. संजयराव ढवळीकर यांनी संपर्काचा कार्यकर्ता आणि संपर्क विभागाचे संघटनात्मक जडण घडण याविषयी मार्गदर्शन केलें. दुसऱ्या दिवशी प्रथम संत शिरोमणी श्री रविदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन प्रांत मंत्री श्री किशोरजी चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. संपर्क कार्यकर्ता या विषयाचे सत्र प्रांत मंत्री श्री मा. किशोरजी चव्हाण यांनी घेतले. प्रथम त्यांनी संत शिरोमणी श्री रविदास महाराज यांच्या जयंती निमित्त त्यांच्या जीवन कार्याचा आढावा घेऊन त्यांना आदरांजली वाहिली.संत रविदास महाराज यांच्यावर सुद्धा धर्मांतर करण्यासाठी दबाव आणण्यात आला होता, परंतु संत रविदास महाराजांच्या आध्यात्मिक शक्ती पुढे ज्यांनी दबाव आणला ते नुसते हिंदू झाले नाही तर महाराजांचे शिष्य बनले.संपर्क कार्यकर्ता या विषयाची माहिती देताना विशेष संपर्कासाठी आवश्यक असणारे कार्यकर्ता गुण याचे विश्लेषण केले. तसेच विशेष संपर्क कसा करावा, त्यासाठी संपर्काची वेळ घेणे, शिष्टाचार पाळणे, परिणामकारक संवादशैली, कार्यकर्त्यांना विहिप कार्याची माहिती असणे आवश्यक अशा विविध बाबींची माहिती दिली. त्यानंतर प्रांत सहमंत्री ॲड सतीशजी गोरडे यांनी विशेष संपर्काचे महत्व स्पष्ट केले.

समारोप : मा. श्री. अंबरीशजींनी आपल्या ओघवत्या वाणित समारोप केला. वि. हिं. प कार्यकर्ता कसा कसा असावा हे सांगताना इतकी उदाहरणं

दिली की समारोपाची गरिमा एकदम बदलून गेली. मा. अंबरीशजी एक उदाहरणात म्हणाले कार्यकर्ता म्हणजे संघटनेचे प्रतिबिंब आहे. कार्यकर्त्यांचे प्रतिबिंब जितके स्वच्छ तितके संघटनेचे नावलौकिक उज्वल. जेवढे कार्यकर्ते सुसंस्कृत तितकीच संघटनेची समाजातील विश्वासार्‍हता. मा. अंबरीशजींनी वर्गाचे उदघाटन आणि समारोप अत्यंत प्रभावी पणे मांडला. वर्गास अपेक्षित संख्या २५ जिल्ह्यातील संपर्काचे जिल्हा प्रमुख आणि प्रांत टोळीचे ६ सदस्य, आयामाचे पालक, ज्या जिल्ह्याना अजून पर्यंत संपर्क प्रतिनिधी नाही आशा जिल्ह्याचे सहमंत्री ज्यांच्या कडे सामाजिक पुंज ची जबाबदारी आहे असे एकूण ३२ संख्या अपेक्षित होती पैकी २७ वर्गार्थी उपस्थित होते. सोलापूर विभाग मंत्री श्री. विजय कुमार पीसे, जिल्हा मंत्री श्री. संजय कुमार जमादार, प्रांताच्या संपर्क टोळीचे सदस्य श्री. पुरुषोत्तम उडता, सोलापूर जिल्हा संपर्क प्रमुख श्री. प्रविण जिल्हा यांनी नियोजन अतिशय उत्कृष्ट रित्या लावले होते.

मालेगाव, नाशिक शहर, नाशिक ग्रा., अहिल्या नगर, पुणे, कराड, पंढरपूर या जिल्ह्यांची अनुपस्तिथी जाणवली. समाधानाची गोष्ट वर्ग संख्यात्मक आणि गुणात्मक उत्तमरित्या यशस्वी झाला.

विशेष आभार : श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान संस्थेचे अध्यक्ष श्री.महेश इंगळे यांचे बहुमोल्य सहकार्य वर्गास लाभले. संस्थेचे विशेष आभार.

आपला, श्रीकांत पोतनीस

आयाम प्रमुख, विशेष संपर्क विभाग, वि. हिं. प. पश्चिम महाराष्ट्र प्रांत





## विश्व हिंदू परिषद आयोजित अखिल भारतीय गो भक्त महिला संमेलन

**दिल्ली : १२-१३-१४ फेब्रुवारी २०२६**

दिल्लीच्या पवित्र भूमीवर आयोजित या भव्य संमेलनात सहभागी होणे, माझ्यासाठी केवळ कार्यक्रम नव्हता तर एक परिवर्तन घडवणारा प्रवास होता. भारताच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या समर्पित महिलांसोबत संवाद साधताना एक वेगळीच ऊर्जा आणि एकात्मतेची भावना अनुभवायला मिळाली. पश्चिम महाराष्ट्रातून निवड झालेल्या १७ महिलांमध्ये माझी निवड झाली – हा क्षण माझ्यासाठी अभिमानाचा आणि जबाबदारीची जाणीव करून देणारा ठरला.

या संमेलनात –

गोमातेचे आध्यात्मिक व वैज्ञानिक महत्त्व

गो आधारित नैसर्गिक शेतीचे मॉडेल्स

गो आधारित उद्योग व स्टार्टअप संधी

पर्यावरणपूरक जीवनशैली

याबद्दल अतिशय सखोल आणि व्यावहारिक मार्गदर्शन मिळाले.

माननीय सावला जी (अध्यक्ष, विश्व हिंदू परिषद) यांचे अनुभव ऐकताना कार्याची व्यापकता जाणवली. गुरुप्रसाद जी यांनी दिलेली business strategy ची दिशा अत्यंत उपयुक्त ठरली. तसेच महाराष्ट्र क्षेत्र प्रमुख भाऊराव जी यांचे मार्गदर्शन प्रेरणादायी होते.

आपल्या पश्चिम महाराष्ट्र क्षेत्र प्रमुख सुनीता ताई देशमुख, प्रांत संतोषभाऊ खामकर आणि माझ्या संपूर्ण टीमचा मिळालेला सहकार्यभाव हा या प्रवासाचा सर्वात सुंदर भाग होता. व

दिल्लीमध्ये महाराष्ट्र गीत गाताना मन अभिमानाने भरून आले – खऱ्या अर्थाने एक भारत, श्रेष्ठ भारत अनुभवला.

या संमेलनातून मी फक्त माहिती नाही तर एक ध्येय घेऊन परतले आहे –

गोमातेची सेवा

गोसंवर्धनाचा प्रसार

आणि गो आधारित स्वावलंबनाचा मार्ग

नव्या उर्जेसह, नव्या जोमाने कार्य सुरू आहे!

जय गो माता...

आपलीच शिवजन्म भूमीतील भूमिकन्या आरती कुंडलिक काशिद

# ।। श्रीनाथ म्हस्कोबा प्रसन्न ।।

# श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखाना लि; श्रीनाथनगर,

पाटेठाण, पो. राहू, ता. दौंड, जि. पुणे - ४१२२०७

कारखाना साईट : **EXABX No.** ९९२३००२९२४ / ८५५१८५८८९९

ईमेल : **smskl@rediffmail.com, smskl@shreenathsugar.com**

## कारखान्याची ठळक वैशिष्टे

* ✻ १० MW क्षमतेचा पॉवर प्लँट
* ✻ ४५०० TCD ऊस गाळप क्षमता
* ✻ ८० KLPD क्षमतेचा डिस्टीलरी व इथेनॉल प्लँट
* ✻ १० मे. टन प्र. दिन क्षमतेचा CNG प्रकल्प
* ✻ ३० टन प्र. क्षमतेचा $CO^2$ प्रकल्प
* ✻ शेतकरी बांधव व समाज सेवेसाठी कटिबद्ध
* ✻ ३ KLPD क्षमतेचा बायोमास पासून इथेनॉल निर्मिती (2G R & D) प्लँट

---

**मा. श्री. पांडुरंग आबाजी राऊत**
अध्यक्ष व कार्यकारी संचालक

**मा. ॲड. श्री. विकास रामचंद्र रासकर**
कार्याध्यक्ष

---

## संचालक मंडळ

| | | |
|---|---|---|
| श्री. महेश संभाजीराव करपे | श्री. हेमंत संभाजीराव करंजे | श्री. योगेश दत्तात्रय ससाणे |
| श्री. अनिल जयवंतराव भुजबळ | श्री. किसन दिनकर शिंदे | श्री. ज्ञानदेव तुकाराम कदम |
| श्री. अनिल लक्ष्मण बधे | श्री. प्रदिप दत्तात्रय लांडगे | श्री. माधव पांडुरंग राऊत |
| सौ. लता सतिष केंढे | श्री. हनुमंत बबन शिवले | श्री. भगवान दशरथ मेमाणे |

श्री. दत्ताराम मारूती रासकर (मुख्य कार्यकारी अधिकारी) व सर्व प्रवर्तक मंडळ

---

## - मुख्य कार्यालय -

मेघदुत बिल्डींग, २ रा मजला, स. नं. १२/२, भारत पेट्रोल पंपाच्या बाजूला, जुना लोखंडी पूल रस्ता
आकाशवाणी केंद्रासमोर, हडपसर, पुणे २८

**EPABX : 8551868899, 9923002924; Super Fax No. 011-43850261**

**Email : smsklho@rediffmail.com; smsklho@shreenathsugar.com**

# नुपेक्षी कदा राम दासाभिमानी

**सदा सर्वदा देव सन्नीध आहे।**
**कृपाळुपणे अल्प धारीष्ट पाहे।।**
**सुखानंद आनंद कैवल्यदानी।**
**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी।।३६।।**

रामदास स्वामींनी मनाचे श्लोक लिहिले ते मनाला स्थिर करून अध्यात्माकडे जाण्यास मदत करण्यासाठी, अस्थिर, चिंतीत मन कधीच एकाग्र होऊ शकत नाही आणि साधना करू शकत नाही. आपल्या सारख्या सामान्य माणसाचे मन अस्थिर होण्याची अनेक करणे आहेत, जसे कि, जे आपल्या जवळ नाही किंवा ते केवळ इतरां जवळ आहे म्हणून ते आपल्याला मिळावे हि लालसा किंवा सतत कोणती तरी अनामिक भीती अशी अनेक करणे आपलं मन विचलित करण्यास कारणीभूत असतात. आपल्या जवळ आहे त्यात सुख मानून जगणे काय किंवा निर्भय मनाने जगणे काय – हे सगळे आपल्या मानण्यावर म्हणजेच मनावर अवलंबून आहे. स्थिर मन हे परमेश्वर प्राप्तीकडे नेणारे साधन आहे.

मला आलेल्या संकटातून माझी सुटका होईल ? का मी असाच एकटा दुःखात, संकटात अडकून पडेन आणि मला सुख, आनंद कधीच मिळणार नाही? माझे आप्त, सखे, सोयरे एवढेच काय माझा देव तरी मला यातून तारून नेईल का? असे एक ना अनेक प्रश्न जीवनाच्या वळणावर कधी ना कधी तरी आपल्या मनात नक्कीच पडले असतील. आणि ते साहजिक आहे, प्रत्येक मानवाला या जीवनात काही ना काही आणि कधी ना कधी दुःख, संकटाला सामोरे जावे लागते – प्रत्येकाची दुःखाची व्याख्या हि त्याच्या त्याच्या क्षमते नुसार बदलते आणि क्षमता हि परिस्थिती नुसार बदलते.

अश्या दुःखाच्या प्रसंगी आपल्या मना–सज्जनाला रामदासस्वामी काय उपदेश देतात? तर हे मना प्रभू रामावर विश्वास ठेव, श्रद्धा ठेव. का? तर प्रभू राम, हा या कठीण परिस्थिती मधे तुझ्या सोबतच आहे, तो सदा तुझ्या आजूबाजूलाच आहे, फक्त तो कोणत्या रूपात आहे आणि काय संकेत देतो आहे हे तुला शोधायचे आहे. प्रभू राम केवळ एक छोटीशी परीक्षा पाहतो आहे, तुझे धारिष्ट्य पाहतो आहे कि तू या प्रसंगात कसा राहतोस, तुझी श्रद्धा, तुझा आचार, विचार बदलतो का, डळमळतो का ? आणि ते धारिष्ट्य सुद्धा तो कसे तपासतो आहे तर, कृपाळूपणे – म्हणजे मांजरी जशी आपल्या पिल्लाला तोंडाने उचलून नेताना जशी पिल्लाना तिचे दात लागु देत  नाही अगदी तसे काळजी पूर्वक तो आपल्या भक्तांची परीक्षा पहात असतो. जेवढं झेपत तेवढीच अवघड प्रश्नपत्रिका तो देतो. आणि या नंतर मात्र तो कनवाळू राम आनंद आणि चिरकाळ असं सुखच देतो. रामदास स्वामींना एव्हढि खात्री कश्यावरुन वाटते ?

ते शेवटच्या ओळीत सांगतात – प्रभू राम हा भक्ताभीमानी आहे, तो भक्ताला कधीही उपेक्षित ठेवणार नाही आणि कठीण काळात तर नाहीच नाही...

हा झाला उपदेशाचा भाग पण दाखला दिल्याशिवाय खात्री कशी पटणार? उत्तरकाशी येथे नुकत्याच घडलेल्या घटनेतून याची प्रचिती अनुभवास येते.  ४१ कामगार , १७ दिवस बोगद्यात जीव मुठीत घेऊन अडकून पडले होते. पहिल्यांदा तर संपर्क नाही नंतर केवळ पाईपमार्गे खाणे , औषध आणि प्राणवायू पुरवला जात होता पण सुटकेचा मार्ग काही मिळत नव्हता. तरीही ते कामगार बंधू , इतकेच नव्हे तर त्यांचे परिवारजन ईश्वरावर, प्रशासनावर किंवा इतर कोणावर तरी विश्वास ठेऊन आपल्या सुटकेची वाट पाहत होते.  त्यांच्या मनात मृत्युचे भय नसेल का? पुढचा क्षण सुटकेचा कि शेवटचा? पुन्हा प्रियजन भेटतील कि नाही? एक ना अनेक विचार त्यांच्या मनात थैमान घालत असतील. किती दिवस वाट पाहायची माहित नाही आणि वाट पाहायची तर जिथं अडकून पडले तिथं हि परिस्थिती प्रतिकूलच, बाहेर दिवस आहे का रात्र , जिवंत राहणार का मृत्यू सगळंच अस्थिर , अनभिज्ञ. पण अश्याही परिस्थितीत त्यांच्या बाह्य कृतीमध्ये मारामारी नाही, कोणावर क्रोध नाही, मिळाले ती मदत घेत, अज्ञात शक्तीवर दृढ विश्वास ठेऊन  सुखरूप बाहेर पडले. इतके सुखरूप कि कोणालाही बाहेर पडल्यावर

सध्या तपासणी व्यतिरिक्त ऍडमिट करायची सुद्धा वेळ आली नाही. शासन आपल्यापरीने सर्व उपाय करत होते , परकीय तंत्रज्ञान, वैद्यकीय सेवेची तयारी सगळं चालू होतं, पण बाहेर आत कुणाला काय याची कल्पना असणार ? केवळ मला वाचवणारा तो आहे आणि तो संकटकाळी आपल्याला एकटा सोडणार नाही हा विश्वासच त्यांना मानसिकरित्या सुखरूप बाहेर काढू शकला... नुपेक्षी कदा राम दासाभिमानी त्यांचा राम कदाचित त्यांना वेगळ्या रूपात भेटला असेल...

उघड्या डोळ्याने पहिली तर आजूबाजूला अनेक उदाहरणे मिळतील, पण नीट विचार केला तर प्रत्यक्षात आपला अनुभव सुद्धा तपासून पहा. कित्येक वेळेला आपल्याला कठीण प्रसंगातून परीक्षेअंती हा राम किती सहजपणे सोडवून गेला आहे. कोणी म्हणेल आम्हि खूप भोगलं आहे , आमचा कठीण काळ अल्प थोडीच होता , तो कामगारांचा प्रसंग तर १७ दिवसाचा होता, मोठा काळ आहे, अल्प धारिष्ट कुठे आले त्यात ? पण विचार करा कमीत कमी ६०–७० वर्षाच्या आपल्या जीवना मध्ये असे प्रसंग अल्प काळच म्हणावे लागतील ...

आपण थोडीच प्रभू रामासारखे १४ वर्ष कठोर वनवासात काढलेत? कोणाचा कठीण काळ जास्त तर कोणाचा कमी पण दृढ विश्वास ठेवला तर दिसून येईल त्या प्रसंगात सुद्धा तो देव सदा आपल्या सोबतच आहे, कृपाळूपणे आपल्याला सांभाळून पुढे नेत आहे ... आणि अंती सुख, समाधान देणार आहे कारण रामदास स्वामींनी खात्रीच दिली आहे कि नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ... फक्त हवा आहे तो दृढ विश्वास त्या समर्थ श्रीरामा वर !!!

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**

**प्रमोद पांडुरंग रामदासी (मेथवडेकर)**

◈ ◈ ◈

## गीत

**हिंदू सारा एक मंत्र हा दाहि दिशांना घुमवू या**
**धरती–नभ–पातळहि भारु प्राण पणाला लावूया ।।ध्रु।।**

उच्चनीचता तण जाळावे धगधगत्या कर्तुत्वाने
समाज रसरसता अर्वाचिन पुनः निर्मुया यत्नाने
खचलेला अभिमान जागवू पिचली हृदये सांधूया ।।१।।

कोणी नाही शत्रू आपूला प्रेमाने अवकाश भरु
चारित्र्याच्या आधारावर हिंदूराष्ट्र हे नव उभवू
समन्वयाने नम्रपणाने विद्रोहाला शमवूया ।।२।।

सामाजिक सन्मान निवारा समान सर्वा लाभावा
अन्न–वस्त्र–संस्कार लाभही सहजपणे सर्वा लाभावा
हीच एकता, समता, ममता, पथ ऐक्याचा चालूया ।।३।।

निज सत्वाची जाणिव नसता राष्ट्रजीवनी अर्थ नसे
परंपरा, इतिहास, पराक्रम आठव नुसाता व्यर्थ असे
कोटी मनांना सवे घेऊनी वैभव सारे मिळवू या ।।४।।

समाजभक्ति हीच प्रेरणा राष्ट्रभक्ति हे रुप तिचे
देशद्रोही निष्प्रभ होतील, दर्शन घडता शक्तिचे
विचार येतील अमरत्वाचे सर्व जगाला देऊया ।।५।।

आज कसोटी पुरुषार्थाची, व्यक्तित्वाच्या समर्पणाची
माय भूमीच्या पायी वाहू ओंजळ निज कर्तुत्वाची
अग्निपरिक्षा कोण घेता सुवर्ण तेजे तळपुया ।।६।।

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे कला क्रिडा मंडळ**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता वेल्फेअर सोसायटी**

# अयोध्या vs व्हॅटिकन vs मक्का

● **भारताने जगाला दिलेले ४ लाख कोटींचे उत्तर!**

दोन वर्षांपूर्वीचा २२ जानेवारीचा दिवस आठवा. जेव्हा अयोध्येत रामलल्लांची प्राणप्रतिष्ठा झाली, तेव्हा देशात दोन गट होते. एक गट भावुक होऊन रडत होता, तर दुसरा मबुद्धीजीवीफ गट प्रश्न विचारत होता – मंदिराने काय पोट भरणार? त्याऐवजी शाळा किंवा दवाखाने का नाही बांधले?

तेव्हा आपल्याकडे फक्त 'भावना' होत्या, पण 'उत्तर' नव्हते. आज, बरोबर दोन वर्षांनंतर, अयोध्येने स्वतःच त्या प्रश्नाचे उत्तर दिले आहे. हे उत्तर शब्दांचे नाही, तर आकडेवारीचे (Data) आहे.

आज आपण अयोध्येची तुलना जगातील दोन सर्वात मोठ्या धार्मिक सत्ताकेंद्रांशी – व्हॅटिकन सिटी आणि मक्का – यांच्याशी करणार आहोत. हे वास्तव वाचून प्रत्येक भारतीयाची छाती गर्वाने फुलून येईल:

**१. द नंबर्स गेम:** अयोध्येची प्रचंड झेप (The Scale) जगातील कोणत्याही पर्यटन स्थळाचे यश हे तेथील पर्यटकांच्या संख्येवर मोजले जाते.

व्हॅटिकन सिटी : ख्रिश्चन जगाचे केंद्र असलेल्या व्हॅटिकनला वर्षाला सुमारे ९० लाख पर्यटक भेट देतात.

मक्का (सौदी अरेबिया): हज आणि उमरासाठी वर्षाला सुमारे २ कोटी भाविक जातात.

अयोध्या (भारत): सरकारी आकडेवारीनुसार, २०२४ मध्ये अयोध्येत १६ कोटींहून अधिक भाविकांनी भेट दिली. २०२५ च्या पहिल्या ६ महिन्यांतच हा आकडा २३ कोटींवर गेला आहे.

● **विश्लेषण:** अयोध्येतील पर्यटकांची संख्या मक्का आणि व्हॅटिकनच्या एकत्रित संख्येपेक्षा ८ ते १० पट जास्त आहे.

**२. ४लाख कोटींची 'टेम्पल इकॉनॉमी' :** जागतिक ब्रोकरेज फर्म Jefferies आणि SBI Research च्या रिपोर्टनुसार, राम मंदिरामुळे उत्तर प्रदेशच्या अर्थव्यवस्थेत केवळ एका वर्षात २५,००० कोटींचा अतिरिक्त टॅक्स महसूल जमा झाला आहे. जसे सौदी अरेबियाला तेलाखालोखाल सर्वात जास्त पैसा 'मक्का' पर्यटनातून मिळतो (१२ बिलियन), तसेच भारताने अयोध्येच्या माध्यमातून एक 'रिसेशन–प्रूफ' (मंदीतही चालणारे) आर्थिक मॉडेल उभे केले आहे.

**३. सॉफ्ट पॉवर:** भारताचा 'विश्वगुरू' होण्याचा मार्ग हा मुद्दा सर्वात महत्त्वाचा आहे. 'सॉफ्ट पॉवर' म्हणजे काय? तर शस्त्राचा वापर न करता जगावर प्रभाव पाडणे. राम मंदिरामुळे भारताचा 'ग्लोबल साऊथ' आणि 'पौर्वात्य संस्कृतीवर' (Eastern Civilization) प्रभाव वाढला आहे. आज नेपाळ, थायलंड, कंबोडिया आणि मॉरिशससारखे देश भारताकडे केवळ ममित्रफम्हणून पाहत नाहीत, तर 'सांस्कृतिक नेतृत्व' (Cultural Leader) म्हणून पाहत आहेत.

**४. जमिनीचे भाव** : मुंबईला टक्कर २०१९ च्या निकालानंतर अयोध्येतील जमिनीचे भाव ९००% ते १०००% ने वाढले आहेत. पाच वर्षांपूर्वी जिथे एक गुंठा जमीन लाखांत मिळत होती, तिथे आज कोटींची बोली लागत आहे. बड्या कॉर्पोरेट कंपन्या तिथे ७–स्टार हॉटेल्स आणि टाउनशिप्स उभारत आहेत.

● **निष्कर्ष:** दोन वर्षांपूर्वी आपण मंदिरात फक्त मदेवफ पाहत होतो. आज जग त्यात 'देशाची प्रगती'फ पाहत आहे. अयोध्येने सिद्ध केले की, संस्कृती आणि विकास हे शत्रू नाहीत, तर ते एकमेकांचे साथीदार आहेत. जेव्हा श्रद्धा आणि अर्थकारण एकत्र येतात, तेव्हाच खऱ्या अर्थाने 'रामराज्य' अवतरते!

जय श्रीराम!

**व्हॉटस् ॲप वरून साभार**

◈ ◈ ◈


विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!

**जनता बँक गणेशोत्सव मंडळ**

# मला समजलेला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ : भाग ३
# संघ स्थापनेमागचा उद्देश

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक डॉ. श्री. केशव बळीराम हेडगेवार हे काँग्रेसमध्ये सक्रिय होते व देशाच्या स्वातंत्र्य चळवळीतही सहभागी होते. अनेक प्रसंगी त्यांच्या लक्षात आले, की स्वयंशिस्त – सुसंस्कारित तरुण घडला पाहिजे, परंतु देशाच्या स्वातंत्र्याच्या आंदोलनाच्या कार्यामुळे या गोष्टीकडे काँग्रेसही लक्ष देऊ शकत नव्हती व नेते मंडळीही काही करू शकत नव्हते. दुसरीकडे हिंदू धर्म – संस्कृतीबद्दलचा अभिमान संपत चालला होता, अशा परिस्थितीमध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या भारत देशाच्या अखंडतेची व पुनर्वैभव प्राप्त करून देण्याची जबाबदारी कोण घेणार हा प्रश्न डॉक्टरांना भेडसावत होता.

आपल्या भारतभूमीला मातृभूमी मानणारा, पितृभूमी मानणारा, या भूमीमध्ये होऊन गेलेल्या राम – कृष्ण यांना दैवते मानणारा, भगवान गौतम बुद्ध – महावीर या तिर्थंकरांना आदर्श मानणारा, छत्रपती शिवाजी महाराज – महाराणा प्रताप यांना महापुरुष मानणारा केवळ आणि केवळ हिंदू समाजच आहे. या हिंदू समाजाला संघटित करणे व सुसंस्कारित तरुण पिढी उभा करणे हाच यावरचा उपाय आहे हे लक्षात घेऊन डॉ.हेडगेवार यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ स्थापन करण्यामागचा उद्देश संघाच्या प्रार्थनेमध्येच आला आहे. भारत देशाला परमवैभवाला (महासत्ता) घेऊन जाणे हाच संघाचा उद्देश आहे. या राष्ट्राचे भले व्हावे असं वाटणार्यांचं संघटन करणे आणि राष्ट्रहितामध्येच माझं हित आहे अशी भावना असणाऱ्या सुसंस्कृत पिढी निर्माण करणे व यातून राष्ट्राला परमवैभवाकडे नेणे हाच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा स्थापनेमागचा उद्देश आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हा राजकीय पक्ष अथवा संघटना म्हणून स्थापन झालेला नव्हता, त्यामुळे कोणत्याही राजकीय उद्देशासाठी संघाने स्वातंत्र्यपूर्व काळात अथवा स्वातंत्र्यानंतरच्या काळातही काम केलेले नाही. आम्ही जाती निर्मूलन करण्यासाठी अथवा जातीअंताचे कार्य करण्यासाठी स्थापन झालो आहोत असेही संघाने कधीही म्हटलेले नाही. हिंदू समाजाचे संघटन करणे हा अंतिम उद्देश असल्यामुळे हा उद्देश सफल होणे यातच जातीयता – अस्पृश्यता निर्मूलन होणे हे निश्चितच होते. परंतु केवळ हा उद्देश ठेवून संघ स्थापन झालेला नाही. सामाजिक सुधारणा घडवून आणणे हा देखील उद्देश संघाने कधीही ठेवलेला नव्हता. हिंदू समाज संघटित झाला की अनेक प्रश्न आपोआप सुटतील हे संघ निर्मात्यांना माहीत होते, त्यामुळेच सामाजिक सुधारणा करण्याचा उद्देश समोर ठेवण्याऐवजी हिंदू समाज संघटित व सुसंस्कारित बनविला तर अशा सुधारणा सहजासहजी घडून येऊ शकतील हे देखील संघ निर्मात्यांनी आपल्या चिंतनातून जाणले होते म्हणूनच अशा सामाजिक सुधारणांना उद्देश मानून संघ स्थापन झालेला नव्हता. या देशाला परमवैभवाला नेण्याचे कार्य सुसंस्कारित व सुसंघटित हिंदू समाजच करू शकतो याचा विचार करून अशा समाजाच्या निर्मितीसाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना डॉ.केशव बळीराम हेडगेवार यांनी केली व या उद्देशावरच गेल्या शंभर वर्षांपासून संघ कार्य करताना दिसतो आहे.

**– डॉ. सचिन वसंतराव लादे, पंढरपूर**
**पुणे विभाग सहप्रचार प्रमुख, रा.स्व.संघ**

◈ ◈ ◈

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**
**जनता बँक पुणे स्टाफ वेल्फेअर असोसिएशन**

# हिंदूराष्ट्राचे परमवैभव

विष्णुतत्वाची सहज–शुध्द अभिव्यक्ती लक्ष्मी आहे. आपल्या आयुष्यातील वैभवाचा (लक्ष्मीचा) शुध्द स्वरूपाकडे होणारा प्रवासही विष्णुतत्वापर्यंत पोचतो. शिवतत्वाची सहज–शुध्द अभिव्यक्ती शक्ती आहे. आपल्या आयुष्यातील विविध प्रकारच्या शक्तीचा शुध्द बोधाकडे होणारा प्रवासही शिवतत्वापर्यंत पोचतो.

विष्णु–लक्ष्मी, शिव–शक्ती या आजच्या जीवनातच प्रत्येक कणात, जीवात आहे. सजीवाने केलेला प्रामाणिक प्रयत्नच (साधना) त्या ईश्वरी तत्वांना इथल्या इथे, तत्क्षणी व्यक्त करू शकतो – त्यालाच आपण नेहमीच्या भाषेत ईश्वरप्राप्ती म्हणतो. संतानी म्हटलं आहे, देवाचिये द्वारी, उभा क्षणभरी ।। तेणे मुक्ती चारी साधियेल्या ।। – त्याचं सारही हेच आहे, की जो देवाच्या जाणीवेत (द्वारी) स्वत:ला पूर्णपणे क्षणभर जरी उभा राहील, तरी त्याला क्षणभरातच चारी मुक्ती मिळतील. ईश्वराचं अनुसंधान पूर्णपणे व सातत्याने करणं हीच समस्या आहे.

याच दृष्टीने, परमवैभव ही हिंदूराष्ट्राची सहज–शुध्द अभिव्यक्ती आहे. परमवैभव ही ओढून ताणून निर्माण करण्याची गोष्ट नाही.

व्यक्ती व समाजाने मनात धरलेल्या हिंदूधर्माचा शुध्द व प्रत्यक्ष आविष्कार म्हणजेच हिंदूराष्ट्राचं परमवैभव आहे. ते जर साध्य झालं तर हिंदू परमवैभव म्हणजेच हिंदू धर्मराज्य, हिंदू संस्कृती, हिंदू धर्मतत्वांवर आधारित सामाजिक व राजकीय जीवन हे तत्काळ प्रकट होईल – त्याला त्रासणाऱ्या सर्व संकटांचा नाश करूनही हे होईल.

समस्या केवळ सर्व हिंदूंनी हिंदूपणाचा पूर्ण आविष्कार करण्याची आहे. कोणत्याही तत्वाचा शुध्द आविष्कारच त्याची पूर्ण शक्ती प्रकट करतो. हिंदूराष्ट्राचं परमवैभव हिंदूंच्या जाणीवांत, स्मृतीत, कर्मांत, बोधात आत्ताच विद्यमान आहे, पण ते आज आपण हिंदू त्याला 'शुध्द' रूपात व्यक्त करत नाही आहोत. रोजच्या जीवनात, उद्योगांत, प्रवासात, शिक्षणात, व्यवस्थांत, शासनात, बोलण्यात, विचार करण्यात, हसण्यात, लढण्यात, रडण्यात, उत्सवात, कार्यात, चालण्यात, जेवण्यात, फिरण्यात अशा सर्व प्रकारच्या कर्मांत हे हिंदूपण शोधणं व आचरणं, हे हिंदूंचं स्वत:प्रत व जगाप्रत काम आहे.

हिंदू राष्ट्रासारख्या संकल्पनेला 'शुध्दते'चा निकष कसा लावायचा, जी संकल्पना राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, अध्यात्मिक अशा अनेक प्रकारे लोकांकडून आज ग्रहण केली जाते? शिवाय शुध्दतेचं परिमाणही (criteria) व्यक्तीच्या आकलनानुसार बदलू शकतो ही दुसरी अडचण. यासाठी शुध्दता या संकल्पनेचं स्वरूप समजून घेऊ.

अगदी व्यावहारिक पातळीवर पाहिलं तरी, कोणत्याही गोष्टीची शुध्दता म्हणजे तिचं मूळ स्वरूप सूक्ष्मतम व व्यापकतम पातळीवर टिकवता येणं. उदा. तूपाचं उदाहरण घेऊ. आपण उत्तम तूप त्याला म्हणू, ज्याच्या अगदी सूक्ष्म कणाच्या पातळीवरही भेसळ नसणं (सूक्ष्मात मूळ रूप टिकणं) आणि वर्षाला जितके डबे कारखान्यात तयार होतात, त्यातही तीच भेसळ नसलेली गुणवत्ता टिकणं (व्यापक पातळीवर मूळ रूप टिकणं). हीच गोष्ट अध्यात्मात ब्रह्मतत्वाच्या शोधातही आहे – जगातील गोष्टींचं अन्वेषण करताना सूक्ष्मातिसूक्ष्म व तरीही सर्वात व्यापक पातळीवर आपलं मूळ स्वरूप टिकवणारी वस्तू कोणती असा शोध केला, तेव्हा ब्रह्मतत्वाचा अनुभव ऋषींना आला. आणि तो ब्रह्मअनुभव सर्व व्यक्तीना समान प्रकारे येतो (व्यक्तीनिरपेक्षता), याचाही प्रत्यय हिंदू शास्त्रं व संतांची चरित्रं वाचली की कळतं.

वरील तूप व ब्रह्मतत्वाच्या उदाहरणावरून लक्षात येतं की, एखाद्या संकल्पनेबद्दल शुध्दतेचा व व्यक्तीनिरपेक्ष विचार म्हणजे तिची सूक्ष्म व व्यापक, मूळ अवस्थेचा शोध. हिंदूराष्ट्राचा विचार म्हणजे हिंदू धर्माच्या सूक्ष्म आणि व्यापक अशा मूलभूत शास्त्रीय अवस्थेचा शोध व आचरण होय.

हिंदू धर्माचं सूक्ष्म, व्यापक व मूळ रूप म्हणजेच त्याचा अंतिम सिध्दांत – आत्म्याचे तत्वज्ञान किंवा वेदान्त. त्याला अनुसरून आपलं वैयक्तिक, सार्वजनिक व राष्ट्रीय जीवन व्यक्त

करणे हे हिंदूराष्ट्राच्या परमवैभवाला आपापल्या जीवनात तत्काळ व्यक्त करण्याचं साधन आहे.

आत्म्याचे सिध्दांत आमच्या रोजच्या जीवनात आणि सार्वजनिक व्यवस्थांमध्ये अमलात आणणं याची काही उदाहरणं खालीलप्रमाणे आहेत.

१. खाद्य प्राण्याना मारण्याची पध्दत कमी वेदनेची (झटका प्रकारची) असणं – कारण चराचरात एकच आत्मा हा सिध्दांत. परिणाम – सामाजिक पातळीवर क्रूर वृत्तीचा अभाव (हलाल पध्दतीने प्राण्याला मारण्याच्या तुलनेत).

२. निसर्गावर आक्रमण करून त्याचे रिसोर्सेस वापरण्याऐवजी त्याच्या सहकार्यातून (निसर्गाची कमीत कमी हानी करून) त्याचे रिसोर्सेस वापरणं (उदा. आयुर्वेदीय औषधं, सौंदर्यप्रसाधनं) – कारण चराचरात एकच आत्मा हा सिध्दांत. परिणाम – हजारो वर्षे भारतीय जीवनशैली पाळूनही पर्यावरणाचे चक्र न बिघडणे (आजच्या पाश्चात्य जीवनशैलीच्या तुलनेत).

३. सर्व प्रकारच्या देवता, मूर्ती यांची पूजा करण्याचं व्यक्तीला स्वातंत्र्य असणं – कारण प्रत्येक जीव विचारसरणीचे वेगवेगळे पूर्वसंस्कार घेऊन जन्माला येतो. (पुनर्जन्माचा सिध्दांत). परिणाम – समाजात पंथांवर आधारित रक्तरंजित हिंसाचार कमी. (अब्राहमिक व साम्यवाद्यांनी केलेल्या अत्याचारांच्या तुलनेत)

४. योगशास्त्रासारखी समृध्द मानसिक शास्त्रांची उत्पत्ती – कारण, ईश्वर व सजीव एकच हा सिध्दांत. त्यामुळे ईश्वरप्राप्तीसाठी मनावर संशोधन. परिणाम – समाजातील अगदी सामान्य माणसासाठीही योगशास्त्रासारखी आरोग्यशाखा उपलब्ध असणे. समाजातील आरोग्यपातळी सुधारणे. (पाश्चात्य नफेखोर व प्रतिक्रियात्मक मेडिकल विज्ञानाच्या तुलनेत)

आजही आपण आमच्या जीवनात असं संशोधन करू, तर परमवैभव प्रकट व्हायला वेळ नाही.

**श्री. अमित देवधर**

◈ ◈ ◈


**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता वेल्फेअर सोसायटी**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे कला क्रिडा मंडळ**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक गणेशोत्सव मंडळ**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे स्टाफ वेल्फेअर असोसिएशन**

# महाराष्ट्र का नववर्ष - गुड़ी पाडवा और उत्तर भारत का हिंदू नववर्ष : भारतीय संस्कृति की एकात्म परंपरा

भारत विविधताओं का देश है, जहाँ भाषा, वेशभूषा, खान–पान और रीति–रिवाज भिन्न होते हुए भी सांस्कृतिक मूल एक ही है। इसी सांस्कृतिक एकता का सुंदर उदाहरण है हिंदू नववर्ष, जिसे देश के विभिन्न भागों में अलग–अलग नामों और परंपराओं के साथ मनाया जाता है। महाराष्ट्र में इसे गुड़ी पाडवा कहा जाता है, जबकि उत्तर भारत में इसे चैत्र नवरात्रि के आरंभ के रूप में हिंदू नववर्ष माना जाता है। दोनों पर्वों का समय लगभग समान होता है और ये भारतीय पंचांग के चैत्र मास के शुक्ल पक्ष की प्रतिपदा तिथि को मनाए जाते हैं।

- **गुड़ी पाडवा का महत्व**

महाराष्ट्र में गुड़ी पाडवा अत्यंत श्रद्धा और उत्साह के साथ मनाया जाता है। 'गुड़ी' का अर्थ है विजय ध्वज और 'पाडवा' का अर्थ है प्रतिपदा। इस दिन घरों के बाहर एक विशेष प्रकार की ध्वजा स्थापित की जाती है, जिसे गुड़ी कहते हैं। एक बाँस के डंडे पर रेशमी वस्त्र, आम के पत्ते, नीम की पत्तियाँ, फूलों की माला और ऊपर चाँदी या तांबे का कलश लगाया जाता है। इसे घर के मुख्य द्वार या खिड़की पर ऊँचाई पर स्थापित किया जाता है। यह समृद्धि, विजय और शुभारंभ का प्रतीक माना जाता है।

पौराणिक मान्यताओं के अनुसार इस दिन भगवान श्रीराम ने रावण पर विजय प्राप्त कर अयोध्या लौटने के बाद राज्याभिषेक किया था। कुछ मान्यताओं में इसे सृष्टि के आरंभ का दिन भी माना गया है, जब ब्रह्मा जी ने सृष्टि की रचना प्रारंभ की। इस प्रकार गुड़ी पाडवा केवल नववर्ष ही नहीं, बल्कि सृजन, विजय और सकारात्मकता का प्रतीक भी है।

इस दिन लोग अपने घरों की सफाई करते हैं, रंगोली बनाते हैं, नए वस्त्र धारण करते हैं और विशेष पकवान बनाते हैं। पारंपरिक रूप से नीम और गुड़ का मिश्रण खाया जाता है, जो जीवन के सुख–दुख को समान भाव से स्वीकार करने का संदेश देता है।

- **उत्तर भारत में हिंदू नववर्ष**

उत्तर भारत में चैत्र शुक्ल प्रतिपदा से नवसंवत्सर का आरंभ माना जाता है। यह दिन विक्रम संवत के अनुसार नववर्ष की शुरुआत है। इस अवसर पर कई स्थानों पर शोभायात्राएँ निकाली जाती हैं, मंदिरों में विशेष पूजा–अर्चना होती है और घरों में कलश स्थापना के साथ नवरात्रि का शुभारंभ होता है।

चैत्र नवरात्रि के नौ दिनों में माँ दुर्गा के नौ स्वरूपों की आराधना की जाती है। भक्त उपवास रखते हैं, दुर्गा सप्तशती का पाठ करते हैं और घर–घर में धार्मिक वातावरण बना रहता है। इस प्रकार उत्तर भारत में नववर्ष आध्यात्मिक ऊर्जा और भक्ति के साथ आरंभ होता है।

- **हिंदू धर्म में देवी–देवताओं का महत्व**

हिंदू धर्म की एक विशेषता यह है कि इसमें असंख्य देवी–देवताओं की उपासना की जाती है। यह बहुलता वास्तव में एक गहन दार्शनिक दृष्टिकोण को दर्शाती है। हिंदू धर्म का मूल सिद्धांत है – एकं सद् विप्रा बहुधा वदन्ति अर्थात् सत्य एक है, परंतु ज्ञानी उसे अनेक नामों से पुकारते हैं।

हिंदू धर्म में त्रिदेव – ब्रह्मा, विष्णु और महेश – सृष्टि, पालन और संहार के प्रतीक माने जाते हैं। भगवान विष्णु के विभिन्न अवतारों में श्रीकृष्ण और श्रीराम विशेष रूप से पूजनीय


**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता वेल्फेअर सोसायटी**

हैं। इसी प्रकार भगवान शिव संहार और तपस्या के प्रतीक हैं। देवी शक्ति के अनेक रूप – दुर्गा, लक्ष्मी और सरस्वती – क्रमशः शक्ति, धन और ज्ञान का प्रतिनिधित्व करते हैं।

असंख्य देवी–देवताओं की उपासना का अर्थ यह नहीं कि हिंदू धर्म में अनेक ईश्वर हैं, बल्कि यह जीवन के विभिन्न पक्षों की प्रतीकात्मक अभिव्यक्ति है। जैसे ज्ञान के लिए सरस्वती, धन के लिए लक्ष्मी और बल के लिए हनुमान जी की पूजा की जाती है। यह परंपरा मनुष्य को यह सिखाती है कि जीवन बहुआयामी है और प्रत्येक क्षेत्र में संतुलन आवश्यक है।

- **सांस्कृतिक एकता का संदेश**

चाहे महाराष्ट्र का गुड़ी पाडवा हो या उत्तर भारत का हिंदू नववर्ष, दोनों पर्व भारतीय संस्कृति की गहराई और व्यापकता को दर्शाते हैं। भिन्न नाम और परंपराएँ होते हुए भी मूल भावना समान है – नव आरंभ, सकारात्मकता, धर्म और कर्तव्य के प्रति जागरूकता।

आज के आधुनिक युग में, जब जीवन भागदौड़ और तनाव से भरा हुआ है, ऐसे पर्व हमें अपनी जड़ों से जोड़ते हैं। वे हमें यह स्मरण कराते हैं कि समय चक्र निरंतर चलता रहता है, और हर वर्ष एक नई आशा, नया संकल्प और नई ऊर्जा लेकर आता है।

अंततः, गुड़ी पाडवा और हिंदू नववर्ष केवल कैलेंडर परिवर्तन नहीं, बल्कि आत्मचिंतन, आध्यात्मिक जागरण और सांस्कृतिक गौरव का उत्सव हैं। हिंदू धर्म की विविध देवी–देवताओं की परंपरा इस नववर्ष को और भी अर्थपूर्ण बनाती है, क्योंकि यह हमें सिखाती है कि जीवन के हर पहलू में दिव्यता का अनुभव किया जा सकता है। यही भारतीय संस्कृति की वास्तविक पहचान है – विविधता में एकता और आस्था में व्यापकता।

**अतुल मालवीय, पुणे**

◈ ◈ ◈


**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे स्टाफ वेल्फेअर असोसिएशन**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता वेल्फेअर सोसायटी**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे कला क्रिडा मंडळ**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक गणेशोत्सव मंडळ**

# शिवजातस्य संभाजी महाराज

**तस्यात्मजः शम्भूरिती प्रसिद्धः समस्तसामंतशिरोवतंसः।**
**यः काव्यसाहित्यपुराणगीतकोदंडविद्यार्णवपारगामी ।।**

अर्थ : काव्य, अलंकारशास्त्र, पुराणे, संगीत, आणि धनुर्विद्या यात पारंगत असलेला, त्यांचा (छ. शिवाजीचा) मुलगा शंभू; सर्व राजांच्या अग्रस्थानी शोभत आहे.

(संदर्भ : छ. संभाजी महाराज विरचित बुधभुषणं श्लोक १५)

छ. शिवाजी महाराजांनी अहोरात्र झटून राज्य साधनेची लगबग करून, सह्याद्रीच्या कुशीत एक स्वाभिमानी स्वराज्य उभे केले. त्यांच्या अकाली मृत्यूनंतर त्या स्वराज्याची जबाबदारी छ. संभाजी महाराजांनी तितक्याच ताकदीने उचलली आणि स्वराज्याचे रक्षण करताना अखेर स्वतः च्या प्राणांची आहुती दिली. हिंदवी स्वराज्याचे दुसरे छत्रपती, धर्मवीर छ. संभाजी महाराजांच्या व्यक्तित्वाचा धावता आढावा घेण्याचा एक प्रयत्न.

ज्येष्ठ शुद्ध १२ शके १५७९ (आंग्ल दिनांक १४ मे १६५७) या शुभदिनी, माँसाहेब सईबाई यांचे पोटी पुरंदरगडावर संभाजीराजेंचा जन्म झाला.

शिवरायांची कारकीर्द सुरू होउन पहिले दशक पूर्ण होत असताना संभाजीराजांचा जन्म झाला होता. त्यानंतर अवघ्या ३ वर्षांत शिवाजी महाराजांचा अफझल वधाचा बृहद पराक्रम घडला. याच दरम्यान सईबाईंचे दुःखद निधन झाले. त्यामुळे स्वराज्य साधनेची धडपड करणारा पुत्र आणि त्याचा पुत्र या दोघांवर मायेची पाखर धरण्याची जबाबदारी राजमाता जिजाऊंकडेच होती. ज्या माँसाहेब जिजाऊनी शिवाजी महाराजांसारख्या शूर, नीतिमंत, कीर्तिवंत आणि यशवंत राजाची जडण घडण केली त्याच माँसाहेब जिजाऊनी संभाजी राजांची देखील जडण घडण केली. जे संस्कार शिवरायांवर झाले तेच संस्कार संभाजीराजांवर झाले असणार यात शंकाच नाही.

प्रतिपदेच्या चंद्रकले प्रमाणे वृद्धिंगत होत असणाऱ्या हिंदवी स्वराज्याचा युवराज हा, शस्त्र, शास्त्र, राजकारण, धर्मकारण, अर्थकारण, समाजकारण या सर्वांमध्ये पारंगत असलाच पाहिजे हे ध्यानी धरूनच, संभाजीराजांची शिक्षण व्यवस्था केली गेली. त्यामुळे मल्लविद्या, धनुर्विद्या, घोडाफेक, तलवारबाजी, भालाफेक, पट्टा चालवणे आदी सैनिकी शिक्षण तर पुरोहितांकडून रामायण श्रवण, पुराण श्रवण आदी धार्मिक शिक्षण देखील त्यांना देण्यात आले होते. सैनिकी शिक्षण केवळ शिकण्यापुरते मर्यादित न ठेवता शिवाजी महाराजांनी त्यांना काही वेळेस ५००० सैनिकांच्या तुकडीचे थेट नेतृत्व करण्यासाठी मोहिमेवर सुद्धा धाडले होते. एकंदरीतच काय तर, वर म्हटल्याप्रमाणे युवराज हाच भविष्यातला राजा असतो हे मर्म मनी ठेऊनच संभाजीराजांचे बालपण युवावस्था हि अश्या प्रकारच्या शिक्षणानी परिपूर्ण करण्यात आले होते. आपल्या पित्याचे पराक्रम पाहण्याची-ऐकण्याची संधी, उपजत असणारी धडाडी, शौर्य, सैनिकी शिक्षण, सैनिकी तुकड्यांचे नेतृत्व, शिवाजी महाराजांच्या निष्ठावान, कर्तृत्वसंपन्न सहकाऱ्यांचे अनुभव या साऱ्यामुळे संभाजीराजांठायी लष्करी कारवायातील निर्णयांची परिपक्वता निर्माण झाली होती.

संभाजीराजांचे कर्तृत्व हे केवळ शिपाईगिरी पुरते मर्यादित नव्हते. त्यांना खुद्द शिवाजीराजांनी मुलकी कारभाराची जबाबदारी देखील दिली होती. बऱ्याचवेळा इंग्रजांशी वाटाघाटी करण्यात संभाजीराजे आपली मुद्सद्देगिरी दाखवत असत. १६७७ साली इंग्रजांची राजापूरची वखार लुटल्यानंतर त्यांच्याशी पुढील वाटाघाटी करण्याकरता खुद्द शिवाजी महाराजांनीच संभाजीराजांना इंग्रजांकडे पाठवले होते. तह-करार-मदार, वाटाघाटी करण्यात तरबेज असणाऱ्या आपल्या अन्य सरदार, मंत्र्यांपेक्षा संभाजी महाराजांवर देण्यात आलेली ही जबाबदारी हीच संभाजीराजांच्याकडे देण्यात आली यातूनच त्यांची मुद्सद्देगिरी दिसते. संभाजीराजेंचा प्रकटपणे राजकारणात प्रवेश झाला तो आग्रा प्रकरणात. वयाच्या ८ / ९ व्या वर्षीच ते पाच हजारांचे मनसबदार झाले.

औरंगझेबाच्या तावडीतून सही सलामत सुटल्यानंतर, महाराज राजगडी पोहोचले पण संभाजीराजेंना मात्र मागे ठेवावे लागले होते. अर्थात यामध्ये संभाजीराजेंच्या सुरक्षेचाच विचार होता हे उघड आहे.

शिवाजी राजांच्या अनेक मास्टर स्ट्रोक पैकी हा एक होता हे आपण जाणतोच, पण अश्या या अटीतटीच्या वेळी ८/९ वर्षांचे संभाजीराजे आपल्या वडिलांपासून, दूर राहून, मुघली सैनिकांचा ससेमिरा चुकवून, प्रसंगी त्यांना ठकवून अनोळखी माणसांसोबत २-३ महिने प्रवास करतात हे विशेषच म्हणावे लागेल. राजकारणाचे चातुर्यपूर्ण डाव, प्रसंगी सावधपणे शत्रूला फसवणे या बाबींचे प्रात्यक्षिकच त्यांना या प्रवासात पाहायला मिळाले होते असे वाटते.

हिंदवी स्वराज्याच्या पहिला अभिषिक्त युवराज आणि दुसरा अभिषिक्त राजा अशा दोनही भूमिकांतून संभाजीराजांचा प्रवास झाला होता. छ. शिवरायांच्या हयातीतच म्हणजे युवराज असतानाच त्यांची राज्यकारभारामध्ये चुणूक दिसली होती.

वेळ प्रसंगी रयत; मंत्र्यांपेक्षा युवराजांकडेच निवाड्याकरता येत होती यावरूनच रयतेचा विश्वास मिळवण्यासाठी संभाजीराजेंनी दाखवलेले कर्तृत्व स्पष्ट होते.

कोणताही निवाडा सर्वमान्य होण्याकरता आवश्यक न्याय्यबुद्धी आणि मुख्य म्हणजे आपल्या पित्याचे पाहिलेले-ऐकलेले निवाडे, धोरणे यांमुळे संभाजीराजानी केलेले निवाडे रयतेस निश्चितपणे भावत असत. परंतु असे असले तरी, स्वतः च्या अखत्यारी बाहेरील तंट्यांमध्ये संभाजी राजांनी निर्णय दिले नाहीत. अर्थात यामधूनही त्यांची नियमांशी असणारी बांधिलकी आणि पर्यायाने न्यायबुद्धीच प्रतीत होते.

१६८० साली छ. शिवरायांच्या निधनानंतर, छत्रपतीपद भूषवतानाची त्यांची कारकीर्द ही अवघी ९ वर्षांची असली तरी, वादळी आणि पदोपदी परीक्षा पाहणारी ठरली होती.

आपल्या कर्तृत्ववान पित्यापाठी, छत्रपती म्हणून घेतलेली रयतेची जबाबदारी संभाजीराजांनी आपल्या पित्याला शोभेल अशीच पार पाडली यात शंकाच नाही.

संभाजीराजांना छत्रपती म्हणून कारभार सुरु करतानाच, आपलेच म्हणवणाऱ्या मंत्री, सरदार यांची कट-कारस्थाने आणि राजकारण यांना तोंड द्यावे लागले. आपल्या विरुद्धच्या तीन कपट-कारस्थानातून संभाजीराजे मोठ्या सावधतेने आणि चलाखीने सुखरूप बाहेर पडले.

छ. शिवरायांच्या निधनानंतर निर्माण झालेल्या नेतृत्वाची पोकळी संभाजीराजांच्या राज्याभिषेकाने, मंचकारोहणाने भरून निघाली. या घटनेचे महत्व विशद करताना, इतिहासकार वा. सी. बेंद्रे सांगतात की;

धार्मिक वेदोक्त विधीने प्रतिष्ठापित अश्या हिंदवी स्वराज्याच्या राजसिंहासनाच्या राजपरंपरेत दैववशात घडून आलेल्या घालमेलीमुळे व धर्मनिष्ठ व राजनिष्ठ प्रजेच्या मनात जे एक किल्मिष निर्माण केले गेले होते ते पुन्हा ऐन्द्रीयाभिषेक विधीने दूर केले. स्वराज्याच्या पवित्रतेची जाणीव दृढ केली गेली.

संभाजी महाराजांच्या धर्मविहित आचारआचरणुकीत दृष्टिगोचर होणारा आत्मविश्वास मोगली भीषण परचक्रालाही यशस्वीपणे व निर्धाराने तोंड देण्यास प्रवृत्त करत होता. हाच निर्धार व हिंदवी स्वराज्यावरील श्रद्धा औरंगजेबाला वीस वर्षांच्या आपल्या प्रयत्नांच्या निष्फळतेच्या जाणिवेतच महाराष्ट्राच्या भूमीत निराशेने देह ठेवावा लागण्यास कारण झाली.

एक राज्यकर्ता म्हणून आपल्याच मंत्रिगणांना कठोर शासन करावे लागले हे स्वराज्याचे दुर्दैव म्हणावे लागेल. वास्तवात, एका अभिषिक्त युवराजा विरुद्ध कट-कारस्थान करणे हा राजद्रोहच म्हणावा लागेल, पण केवळ त्या मंत्रिगणांच्या पूर्व पुण्याईला स्मरून, छ. संभाजी महाराजांनी दोषी मंत्रिगणांना क्षमादान केले हा त्यांचा मोठेपणाच म्हणावा लागेल. असे असूनही जेंव्हा अभिषिक्त छत्रपती असणाऱ्या संभाजी महाराजांच्या विरोधात कट-कारस्थानं झाली तेंव्हा, गद्दारीची विषवल्ली उपटून काढण्याशिवाय पर्यायच राहिला नाही आणि म्हणून अखेर कठोर निर्णय घेणे संभाजीराजांना भाग पडले. खरे तर, एक युवराज म्हणून, प्रजापालक म्हणून छ. संभाजी महाराज कधीही कोठेही कमी पडले नाहीत.

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे कला क्रिडा मंडळ**

आपल्या माता–पित्या कडून मिळालेला सत्शीलतेचा वारसा आणि आज्ञीकडून (माँसाहेब जिजाऊ ) मिळलेले संस्कार त्यांनी मरणाच्या दारात उभे असताना देखील जपले; पण असे असूनही संभाजी महाराजांवर झालेले घाणेरडे आरोप हे महाराष्ट्राचे दुर्दैव म्हणावेच लागेल.

वा. सी. बेंद्रे, डॉ. कमल गोखले यांच्या संशोधनाअंती संभाजी महाराजांवरील आरोपांची जळमटे दूर झालेली आहेत. प्रत्येक महाराष्ट्रीयांनी या संशोधकाचे उपकारच मानले पाहिजेत.

आता आपण संभाजी राजांची छत्रपती, स्वराज्य रक्षक म्हणून कशी कारकीर्द होती या बाबत माहिती घेणार आहोत. हिंदवी स्वराज्याचे दुसरे छत्रपती, धर्मवीर छ. संभाजी महाराजांच्या व्यक्तित्वाचा धावता आढावा घेण्याचा एक प्रयत्न.

शिवाजी महाराजांप्रमाणेच संभाजी राजांनी स्वतःस (राजा या भूमिकेतून) केंद्र स्थानी ठेऊन, अष्टप्रधान मंडळाची रचना तशीच चालू ठेवली होती. स्वराज्याची महसूल व्यवस्था प्रांत रचना, न्याय व्यवस्था, मुलकी कारभाराच्या व्यवस्था, देशमुख–देशकुलकर्णी यांचे अधिकार आदी बाबी तश्याच पुढे चालू ठेवल्या होत्या. इंग्रज–पोर्तुगीज–डच आदी व्यापारी मंडळींसोबत असणारे करार–मदार देखील तसेच पुढे चालू ठेवले होते.

संभाजीराजांनी एकाच वेळी अनेक शत्रूंशी झुंज देत, स्वराज्याचे रक्षण केले आणि विस्तारही केला हे सर्वश्रुत आहेच. परंतु कल्याणकारी राजांचा पुत्र असणारा हा दुसरा कल्याणकारी राजा प्रजावत्सल होता यात शंका नाही. संभाजीराजांची स्वराज्य साधना ही जनतेला स्वाभिमानाने जीवन व्यतीत करता यावे यासाठीच होती. उदाहरण द्यायचे झाले तर कारवार भागात हिंदी माणसांची गुलाम म्हणून होणारी विक्री जबरदस्त कर–जकात लावून अखेरीस संभाजीराजांनी बंद पाडली होती हे एक उदाहरण देता येईल. संभाजी राजांच्या प्रजादक्ष कारभाराबद्दल सांगताना, डॉ. सौ कमल गोखले लिहितात,

संभाजीमहाराजांना अंतर्गत आणि परसत्ताक प्रश्न सोडवण्यात बरीच शक्ती खर्च करावी लागली होती. त्यांना अनेक आणीबाणीच्या प्रसंगांना तोंड द्यावे लागत होते. स्वराज्याला चारी बाजूने शत्रूने वेढले होते. अश्या परिस्थितीतून जात असताना त्यांनी प्रजेकडे दुर्लक्ष केलेले दिसत नाही. शत्रूने मुलुख लुटला तर तेथील रयतेला सवलती देण्यात येत असत. कणी काही कारणाने परागंदा झाले तर त्यांना प्रोत्साहन देऊन पुनर्वसन करण्यासाठी सूट दिली जाई ओसाड पडलेल्या जमिनीत लोकांनी पुन्हा शेती करावी म्हणून जास्तीत जास्त सवलती देण्यात येत असत. संभाजी महाराज आणि त्यांच्या अधिकाऱ्यांकडून अभयपत्र, कौलनाम दिला जात असे. काही लोक बाकी थकली म्हणजे धास्तीने गाव सोडून जात. अशा प्रसंगी त्यांनी आपापल्या गावी येऊन राहावे म्हणून अधिकारी त्यांना पत्रे देऊन अभय देत. कोणत्याही कारणाने शेतीचे नुकसान होणार नाही याची दक्षता घेतली जात असे. लोकांना हरप्रकारे दिलासा देऊन राज्यात स्थिरस्थावर राहून कारभार नीता चालावा म्हणून काळजी घेण्यात येई.

संभाजीराजांच्या कारकिर्दीतील आणखी एक महत्वाचा भाग म्हणजे त्यांचे धार्मिक धोरण. मोहिमा, चकमकी लढाया यांच्यादरम्यान जर कोणी हिंदू मनुष्य, पोर्तुगीज किंवा मुसलमानांच्या कैदेत पडला तर त्याला धर्मांतर किंवा मृत्यू हे दोनच पर्याय शिल्लक राहत. संभाजीमहाराजांनी; जबरदस्तीने किंवा भयाने मुसलमान, ख्रिश्चन झालेल्या हिंदूंना शुद्धीकरणाद्वारे हिंदुधर्मात परत आणले. एवढेच नव्हे तर गोव्याच्या विजयानंतर, आता येथे हिंदूंचे राज्य जाहले आहे अशी द्वाही फिरवत हिंदूंवर अत्याचार करणाऱ्याला कठोर शासन करण्याचे धोरण ठेवले.

साधुसंताना, विद्वानांना, देवस्थानांना, मठांना सहकार्य करणे हे देखील तत्कालीन राज्यव्यवस्थेचे एक अंगचं होते त्यामुळे, वेदमूर्ती भट आणि ब्राम्हण मंडळी, ईश्वरनिष्ठ गोसावी मंडळी, चिंचवडचे देव, मोरेश्वर गोसावी तसेच चाफळची रामदासी मंडळी आणि देवस्थान, सज्जनगड देवस्थान आणि अन्य मंडळी आदी धार्मिक विभूती, संस्था आणि देवस्थानांना वर्षासने, जमीन, रक्कम, धान्य तसेच नैवेद्य, अन्नछत्रसाठीची सर्वप्रकारची व्यवस्था चोख ठेवणे आदी धर्मकार्य देखील संभाजीराजांनी आपल्या कारकिर्दीत पार पाडली होती. संभाजी महाराजांचे एकंदरीत धार्मिक धोरण पाहता त्यांना 'धर्मवीर' ही उपाधी सार्थ ठरते.

राजकारण, धर्मकारण, प्रजापालन, राज्यरक्षण या व्यतिरिक्त संभाजीराजे हे संस्कृत आणि हिंदी काव्य रचना करणारे विद्वान तथा प्रतिभावंत होते. त्यांनी संस्कृत मध्ये बुधभूषण या ग्रंथाची तर हिंदी भाषेमध्ये नायिका भेद, नखशिखा, सात सतक आदी काव्यांची रचना केली आहे.

नायिका भेद आणि नखशिखा यातील काव्य रस हा जरी

शृंगाराकडे जाणारा असला तरी त्या काव्यांना पौराणिक कथांचेच संदर्भ आहेत. सात सतक हे आध्यत्मिक काव्य संतांच्या हितासाठी लिहिलेले असून त्यातील पहिल्या काही चरणांमध्ये राम–सीता यांची स्तुती आहे.

बुधभूषण ग्रंथामध्येही पुराणग्रंथांचेच संदर्भ,श्लोक आदी देण्यात आलेले आहेत. संभाजीराजांची एकंदरीत काव्य रचना आणि त्यातील संदर्भ पाहता त्यांची वृत्ती हि धार्मिकतेकडे झुकणारीच वाटते.

संभाजी महाराज, युद्ध मोहिमांवर अधिक गुंतले असताना, मुलकी कारभारावर आवश्यक ते नियंत्रण करण्यासाठी, त्यांनी आपली पत्नी येसूबाई यांच्याकडे अधिकार दिले होते. औरंगजेबाच्या आगमनानंतर उद्भवलेल्या धामधुमीच्या काळात, महाराणी येसूबाई यांनीच मुलकी कारभार पहिला होता. तश्या आशयाची पत्रे देखील संशोधकांना उपलब्ध झाली आहेत.

महाराणी येसूबाईंनी अधिकाऱ्यांना, कारभाऱ्यांना, देशमुखांना राजाज्ञा असा शब्दप्रयोग करून पत्रे पाठवलेली आढळतात. आपल्या पत्नीला राज्यकारभारात स्वतंत्र आणि मोलाचे स्थान देणारे संभाजीराजे हे एक अलौकिक उदाहरण आहे असेच मला वाटते.

छ. संभाजीराजांचे व्यक्तिमत्व इतके उत्तुंग होते की; युवराज असल्यापासून सैनिकांमध्ये, सरदारांमध्ये ते सगळ्यांचेच लाडके आणि प्रियतम होते. त्यांच्या तेजाने दिपून जाऊन मूळचे कन्नोजी असणारे छंदोगामात्य कवी कलश संभाजी महाराजांसोबत आपले प्राण अर्पण करायला तयार झाले.

कर्तव्यनिष्ठ, प्रजादक्ष, धर्मरक्षक, स्वराज्यरक्षक छ. संभाजी राजांचा औरंगजेबाच्या छळछावणीत दुर्दैवी अंत होत असताना साक्षात मृत्यू देखील ओशाळला असेल यात शंकाच नाही. मारीता–मारिता मरेतो झुंजेन ह्या उक्तीप्रमाणे महाबलाढ्य शत्रूंशी लढा देत असतानाच, अखेर फाल्गुन अमावास्येच्या दिवशी औरंगजेबाच्या छावणीत तुळापूर येथे त्यांची हत्या करण्यात आली.

संभाजीराजांची ऐन तारुण्यात जीवित तृणवत मानून बलिदान देण्याची वृत्ती, हि आजच्या तरुणाईने आदर्शवत मनाली पाहिजे. आपला धर्म, संस्कृती, स्वराज्य, स्वराष्ट्र यांना असणाऱ्या उच्चतम परंपरांचे जतन केले पाहिजे.

संभाजीराजांचे चरित्र अभ्यासताना, तुळापूर येथील त्यांचे अंत्यस्थळ, वढू–बुद्रुक येथील समाधी, पाहताना त्यांचा ज्वल–जहाल आदर्श समोर उभा राहतो आणि मन–मंदिराच्या गाभाऱ्यात धर्मकार्यासाठी साद घालणारी एक धगधगती तेजःपुंज प्रतिमा प्रगटते आणि नकळत लोकमान्य टिळकांच्या ओळी ओठांवर येतात,

**स्वधर्मे निधनं श्रेयो, गीतावचनं उज्वलम ।**
**शिवसुतोश्च्य हौतात्म्यम धर्म राष्ट्रकृत्वे खलु ते ।।**

टिप : सदर लेखासाठी, वा. सी. बेंद्रे लिखित श्री. छत्रपती संभाजी महाराज आणि डॉ. सौ. कमल गोखले लिखित शिवपुत्र संभाजी, या ग्रंथांतुन संदर्भ घेतले आहेत.

**संकलन –लेखन : श्रीपाद श्रीकांत रामदासी**

◈ ◈ ◈




**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक गणेशोत्सव मंडळ**


आपल्या स्वप्नांना द्या जनसेवेचे पंख...
चारचाकी...
स्वत:साठी असो अथवा व्यवसायासाठी,
खरेदीसाठी एकाच पर्याय ....
जनसेवा कर्ज!
TUCSON
आपल्या आवडत्या
टू व्हिलरसाठी
किफायती
कर्ज फक्त जनसेवेचे!
स्वत:च्या कुटुंबासाठी हवे
स्वत:चे घर,
ठेवा विश्वास
जनसेवेच्या 'घरकुल' कर्जावर!
करा जगाची सफर!
जनसेवा आहे हमसफर!
जनसेवा पर्यटन कर्ज
• आकर्षक व्याजदर • तत्पर सेवा • अल्प प्रोसेसिंग फी
संपर्क : 8485871252
www.janasevabankpune.net
जनसेवा सहकारी बँक लि., हडपसर,पुणे.
जनसामान्यांची असामान्य बँक, जनसेवेसाठी वचनबद्ध !
मुख्य कार्यालय :
प्लॉट क्र. १४, हडपसर इंडस्ट्रिअल इस्टेट, हडपसर, पुणे ४११०१३.

वार्षिक वर्गणी रू. २००/- फक्त

Date of Publication : 26/02/2026 and
Date of Posting : 28/02/2026 at PSO, GPO, Pune 411 001

RNI NO. MAHMAR/2001/05879
Postal Registration No. PCW/077/2024-2026
Licence to post Without Prepayment No. WPP-114

# हिंदुबोध
(मासिक)

सप्रेम नमस्कार,

विश्व हिंदू परिषदेचे संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचणारे एकमेव मासिक म्हणजे **'हिंदुबोध'.**

● मासिक मुल्य रु. २०/- ● वार्षिक वर्गणी रु. २००/- ● त्रैवार्षिक वर्गणी रु. ५००/-

(पंचवार्षिक किंवा आजीवन योजना आता बंद केली आहे.)

oooo

## ✻ हिंदुबोध जाहिरात दरपत्रक ✻

मासिक पाने ४४ (रंगीत पानांसह)

| | |
|---|---|
| रंगीत पूर्ण पान | रु. १.५ लाख |
| साधे पान | रु. १ लाख |
| साधे अर्धे पान | रु. ५०,०००/- |
| साधे १/४ पान | रु. २५,०००/- |
| साधे १/८ पान | रु. १२,०००/- |
| साधे १/१६ पान | रु. ६,०००/- |
| सौजन्य पृष्ठ (तळटीप शुभेच्छा) | रु. २,१००/- |
| हिंदुबोध अंक मुल्य | रु. २०/- |
| वार्षिक वर्गणी | रु. २००/- |
| त्रैवार्षिक वर्गणी | रु. ५००/- |

## ✻ हिंदुबोधची वर्गणी ✻

जनता सहकारी बँक लि. शनिवार-नारायण पेठ शाखा, पुणे - ४११०३०.

**Account Name : Hindubodh**

A/C No : 015220100024473 IFSC Code : JSBP0000015

**HINDU BODH**

Scan QR Code below with your PSP App

Or Pay to VPA
hindubodh@jsb

**कार्यालयीन पत्ता : संपादक, हिंदुबोध**

विश्व हिंदू परिषद, महाराष्ट्र प्रदेश (पश्चिम) १३६०, शुक्रवार पेठ, भारत भवन, पुणे - ४११ ००२.

दूरध्वनी : ९०४९३९६३६३, दूरभाष : (०२०) २४४७१७०१

**Email : hindubodh.pmp@gmail.com**

**हिंदुबोध**

द्वारा : रविकांत कळंबकर, ९८२२२६१६६२

विश्व हिंदू परिषद, १३६० शुक्रवार पेठ, नातूबाग,

भारत भवन, पुणे - ४११ ००२.

दूरध्वनी : ०२०-२४४७१७०१